शनिवार, १७ सप्टेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक ६०

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


## अंतरंग


नवी मुंबईतील दोन माजी नगरसेवक शिंदे गटात/२

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त लेख/४,५,६

पावसाने सप्टेंबर महिन्याची सरासरी ओलांडली/७


## महाराष्ट्राला गुजरातच्या पुढे नेऊन दाखवू –फडणवीस



**मुंबई :** महाराष्ट्राचा औद्योगिक क्षेत्रात पहिला क्रमांक होता, मात्र मागच्या दोन वर्षांत आपण पहिल्या क्रमांकावरून पाचव्या–सहाव्या क्रमांकावर गेलो. गुजरातला नावे ठेवून आणि त्यांच्या विरोधात भाषणे करून आपण पहिल्या क्रमांकावर जाणार नाही. त्यासाठी तशी धोरणे असावी लागतात, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. एवढेच नाही तर वेदांता–फॉक्सकॉनचा प्रकल्प महाराष्ट्रात राहावा म्हणून ज्यांनी काहीही प्रयत्न केले नाहीत ते आम्हाला आता शिकवत आहेत, असेही ते म्हणाले. लघुउद्योग भारतीच्या शुक्रवारी (दि. १६) मुंबईत झालेल्या प्रदेश अधिवेशनात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महाविकास आघाडीच्या काळात महाराष्ट्र मागे गेला आहे, पण पुढील दोन वर्षांत महाराष्ट्राला गुजरातच्या पुढे नेऊन दाखविणार, असे त्यांनी या वेळी म्हटले.

## भारताला मॅन्युफॅक्चरिंग हब बनविणार –पंतप्रधान नरेंद्र मोदी



**समरकंद : वृत्तसंस्था**

भारताला लवकरच मॅन्युफॅक्चरिंग हब बनविणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. ते शुक्रवारी (दि. १६) उझबेकिस्तानमधील समरकंद येथील शांघाय को–ऑपरेशन ऑर्गनायझेशन (एससीओ) शिखर परिषदेत बोलत होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आजही जग कोविड–१९चा सामना करीत आहे. कोविड आणि युक्रेनमधील युद्धजन्य संकटामुळे जागतिक पातळीवर आयात–निर्यातीत अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. ते पाहता आम्हाला भारताला मॅन्युफॅक्चरिंग हब बनवायचे आहे. त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.

आम्ही विकासावर लक्ष केंद्रित करीत आहोत. आज भारतात ७० हजारांहून अधिक स्टार्ट–अप सुरू झाले आहेत. मला आनंद आहे की, भारताची अर्थव्यवस्था ही जगात सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, असेही पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

दरम्यान, या वेळी पंतप्रधान मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि इतर नेत्यांमध्ये प्रादेशिक सुरक्षा आणि व्यापारवाढीवर चर्चा झाली. तत्पूर्वी उझबेकिस्तानचे पंतप्रधान अब्दुल्ला आरिफॉव्ह आणि समरकंदचे राज्यपाल यांनी पंतप्रधान मोदींचे समरकंदमध्ये स्वागत केले.

समरकंदमधील शिखर परिषदेचे दोन सत्रांत नियोजन करण्यात आले होते. यातील पहिल्या सत्रात केवळ शांघाय को–ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या सदस्यांचा सहभाग होता, तर दुसऱ्या सत्रात इतर देशांनाही निमंत्रित करून चर्चा करण्यात आली.

# झोकून देऊन काम करा | आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन

### ■ सेवा पंधरवडा आयोजनासंदर्भात आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजपर्यंत आपण सर्व झोकून देऊन काम करीत राहिलो आहे. त्याचप्रमाणे येणाऱ्या कालावधीतही कार्यरत राहिल्यास अधिक चांगल्या पद्धतीने लोकांची कामे करू शकतो, असे प्रतिपादन भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १६) केले. ते सेवा पंधरवड्याच्या आढावा बैठकीत बोलत होते.

देशाचे यशस्वी व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात म्हणजेच १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान भाजपच्या वतीने विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत विविध उपक्रमांच्या आयोजनासंदर्भात महिला भाजप मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाली.



या बैठकीस भाजप महिला मोर्चाच्या कोकण अध्यक्ष निलम गोंधळी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष स्मिता गायकर, पनवेल तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, रायगड संपर्क प्रमुख चारुशीला घरत, पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, जिल्हा उपाध्यक्ष संध्या शारबिद्रे, प्रतिभा भोईर, बिना गोगरी, वनिता पाटील, मनिषा निकम, प्रिया मुकादम, गीता चौधरी, भाजप जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, भटक्या विमुक्त महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, चिंध्रणच्या सरपंच कमला देशेकर यांच्यासह महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

ॲड. माधवी नाईक आणि विक्रांत पाटील यांची भाजप प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव या वेळी करण्यात आला.




## राज्यभरात मुसळधार पाऊस

### जनजीवन विस्कळीत

**मुंबई : प्रतिनिधी**

सलग दुसऱ्या दिवशी पडलेल्या मुसळधार पावसाने नदी, नाले, ओढे ओसंडून वाहून जनजीवन विस्कळीत झाल्याचे शुक्रवारी (दि. १६) दिसून आले.

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसाचा जोर रायगड, ठाणे, पालघर, मुंबई, पुणे, नाशिक असा सगळीकडेच दिसून आला. गुरुवारपासूनच दमदार पाऊस पडत होता. रात्री त्याचा जोर वाढला तो शुक्रवारी दिवसभर होता. त्यामुळे सकाळी कामावर जाणारे लोक, शाळेत निघालेले विद्यार्थी यांना फटका बसला.

दरम्यान, कोकणासह विविध भागांत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. यासंबंधी हवामान विभागाने वेगवेगळे अलर्ट जारी केले आहेत. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.






# ‘लम्पी’ची लागण झालेल्या जनावरांसाठी क्वारंटाईन सेंटर

### मुख्यमंत्री शिंदेंची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ज्या भागांमध्ये जनावरांना लम्पी आजाराची लागण मोठ्या प्रमाणावर झाली आहे त्या ठिकाणी क्वारंटाईन सेंटर (विलगीकरण कक्ष) उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

याबाबत प्रसारमाध्यमांना माहिती देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, लम्पी आजाराचा प्रभाव आणखी वाढू नये यासाठी लम्पीची लागण झालेल्या जनावरांना क्वारंटाईन सेंटरमध्ये ठेवून आयसोलेट केले जाईल. त्या संदर्भातील सूचना विभागीय आयुक्त आणि जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

राज्यात लम्पी आजाराचा सामना करण्यासाठी लसींचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. याशिवाय लम्पी आजारासंदर्भात टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

## निवडक

### श्रीमंतांमध्ये अदानी जगात दुसऱ्या स्थानी


**नवी दिल्ली :** अदानी समूहाचे प्रमुख गौतम अदानी यांनी जगातील अतिश्रीमंतांच्या यादीत बर्नार्ड अरनॉल्ट यांना मागे टाकून दुसरे स्थान पटकाविले आहे. फोर्ब्सच्या आकडेवारीनुसार अदानी यांची निव्वळ संपत्ती १५३.९ बिलियन डॉलर इतकी आहे. या यादीत त्यांच्या अगोदर आता केवळ इलॉन मस्क हेच असून त्यांची निव्वळ संपत्ती २७३.५ बिलियन डॉलर आहे.


### चीनमध्ये गगनचुंबी इमारतीला आग

**बीजिंग :** चीनमधील चँगशा शहरातील एका उत्तुंग इमारतीला भीषण आग लागली आहे. आग लागलेल्या इमारतीमध्ये सरकारी दूरसंवाद कंपनी असणाऱ्या चायना टेलिकॉमचे कार्यालय आहे. अनेक मजल्यांवर आग पसरली असून अग्निशमन दलाकडून ती विझविण्याचे प्रयत्न सुरू होते.

### राष्ट्रवादी काँग्रेसकडून नवाब मलिकांना डच्चू

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसकडून शुक्रवारी (दि. १६) राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. जमीन घोटाळ्यात अडकलेले माजी मंत्री नवाब मलिक यांना पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीमधून डच्चू देण्यात आला आहे. आधी ते पक्षाचे प्रवक्ते होते, मात्र नव्या कार्यकारिणीत त्यांना स्थान देण्यात आले नाही.

# ‘ते’ सोनिया गांधी यांचे विचार असतील

## शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते रामदास कदमांचा उद्धव ठाकरेंना टोला



**मुंबई : प्रतिनिधी**

संपूर्ण देशाला एकेकाळी बाळासाहेब ठाकरे एक विचार देत होते, मात्र ही स्थिती आता ठाकरे गटाकडे राहिली नाही. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आता जे विचार देतील ते काँग्रेसच्या प्रमुख सोनिया गांधी यांचे विचार असतील असा टोला शिंदे गटातील ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी लगावला आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोन्ही गटांनी शिवाजी पार्कवर मेळावा घेण्यासाठीचा अर्ज महापालिकेकडे केला आहे. त्यावर महापालिकेने निर्णय घेतलेला नाही. शिवाजी पार्कवरून राजकीय वाद नको, अशी भूमिका घेत महापालिकेने शनिवारी या दोघांनाही परवानगी नाकारली तर बीकेसीतील मैदानाचा पर्याय शिंदे गटाने खुला ठेवला आहे. दरम्यान, शिवसेनेचे ४० आमदार, १२ खासदारांनी ठाकरे यांच्या शिवसेनेची साथ सोडली. अनेक जिल्ह्यांमध्येही शिवसेनेत फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच होत असलेला ठाकरेंचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवर होऊ द्यायचा नाही, अशी रणनीती शिंदे गटाने आखली आहे, याचे कारण ठाकरे गटाकडून वारंवार शिंदे गटावर आरोप सुरु आहेत. याचदरम्यान दसरा मेळाव्यावरुन शिंदे गटातील ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. संपूर्ण देशाला बाळासाहेब ठाकरे एक विचार देत होते. मात्र आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे जे विचार देतील ते काँग्रेसच्या प्रमुख सोनिया गांधींचे विचार असतील. त्यामुळे शिवसेना प्रमुखांचे विचार शिवतीर्थावरुन देशभरात पोहचविण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांचा दसरा मेळावा झाला पाहिजे, असे शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी या दरम्यान म्हटले आहे.

शिवाजी पार्कवरच मेळावा होईल यासाठी सर्व ताकद पणाला लावायची, पण पालिकेने वा न्यायालयाने नाकारले तर ‘प्लॅन बी’ म्हणून बीकेसीतील मैदानाचा पर्याय शिंदे गटाने खुला ठेवला आहे. आपला मेळावा शिवाजी पार्कवर झाला नाही तरी चालेल पण कोणत्याही परिस्थितीत उद्धव ठाकरेंना शिवाजी पार्कवर मेळावा घेण्यापासून रोखण्यावर शिंदे गटाचा भर दिसत आहे. याचे कारण मूळ शिवसेना ही शिंदे गटाची शिवसेना असून ठाकरे गटाकडून वारंवार आमची मूळ शिवसेना असल्याचे सांगितले जात आहे तसेच वारंवार शिंदे गटावर टीकाही केली जात आहे. तसेच महापालिकेने दोघांनाही परवानगी नाकारून दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क ‘फ्रीज’ केले तरी शिंदे गटाला राजकीय यशच मिळेल. कारण, त्या परिस्थितीत उद्धव ठाकरे हे शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेऊ शकणार नाहीत.

# उद्धव ठाकरेंच्या एका चुकीमुळे हजारो कोटींची गुंतवणूक गेली

## मंत्री दीपक केसरकरांची टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली जेव्हा महाविकास आघाडी सरकार होते, तेव्हा हजारो कोटींची गुंतवणूक उद्धव ठाकरेंना केवळ वेळ न मिळाल्याने गेली. त्यांच्या केवळ एका चुकीमुळे हजारो कोटींचा गुंतवणूक गेल्याची टीका मंत्री दीपक केसरकर यांनी केली आहे.

वेदांता-फॉक्सकॉर्न हा हजारो कोटींची गुंतवणूक आणि लाखो रोजगार निर्माण करणारा प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याने महाराष्ट्रातील राजकारण पेटले आहे. विरोधी पक्षात असलेल्या महाविकास आघाडीमधील घटक पक्षांसह विविध क्षेत्रातून शिंदे-फडणवीस सरकारवर टिकेची झोड उठत आहे. मात्र याचदरम्यान शिंदे गटातील मंत्री दीपक केसरकर यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर मोठा आरोप केला आहे. याबाबत बोलताना ते पुढे म्हणाले, दिल्लीवरुन मला निरोप आला होता की, उद्धव ठाकरेंसोबत राज्यात गुंतवणूक करणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट करुन द्या. मात्र तेव्हा उद्धव ठाकरेंनी ती भेट केवळ वेळ नसल्यामुळे नाकारली. त्यानंतर उद्धव ठाकरेंचे जे सचिव आहेत, त्यांचा आपल्याला फोन आला की, गुंतवणूक करणाऱ्यांना उद्योगमंत्र्यांना भेटायला सांगा. मात्र त्यांनी उद्योगमंत्र्यांची भेट नाकारली. त्यांना तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनाच भेटायचे होते. त्यामुळे राज्यात हजारो कोटींची गुंतवणूक गमावली, असेही दीपक केसरकर यांनी सांगितले आहे.

# सीकेटी महाविद्यालयात ई-सामग्री विकास विषयावर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजच्या इंटरनेट युगात प्रत्येक विद्यार्थी आणि त्याआधी शिक्षक ही डिजिटल झाला पाहिजे. यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, खांदा कॉलनी, न्यू पनवेल येथे ग्रंथालय विभागाने महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांसाठी सात दिवसाची ‘ई-सामग्री विकास’ विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा १८ ते २३ सप्टेंबर या कालावधीमध्ये होणार आहे. या कार्यशाळेमध्ये तंत्रज्ञानतज्ञ भूषण कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत.

अध्यापन आणि शिकण्याच्या प्रक्रियेत नाविन्यपूर्ण पद्धती लागू करणे, ई-सामग्री विकास साधने आणि तंत्रांमधील अलिकडील ट्रेंड जाणून घेणे अशा विविध विषयांवर व्याख्यान आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येणार आहे.

कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, ग्रंथालय प्रमुख रमाकांत नवघरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ. बी. डी. आघाव, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान प्रमुख डॉ. एस. एन. वाजेकर यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा आयोजित होणार आहे. याची तयारी सुरू आहे.

# बनावट आधार कार्डद्वारे दोन कंपन्यांची फसवणूक

## आरोपींना अटक

**पनवेल : वार्ताहर**

मानपाडा पोलीस ठाण्याकडून बनावट आधारकार्डव्दारे अमेझॉन व फ्लिपकार्ट कंपनीस गंडा घालून त्यांची फसवणूक करणाऱ्या उच्च शिक्षित इंजिनिअर व त्याच्या सर्व साथीदार टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे.

आरोपी यांनी गुगलवरुन ओळख नसलेल्या लोकांचे आधारकार्ड डाऊनलोड करुन, त्या आधारकार्डवरील मुळ इसमाचा फोटो एडीटर अॅपवरुन क्रॉप करुन त्या ठिकाणी आरोपी हे त्यांचा फोटो लाऊन, सिमकार्ड विक्रेता आरोपी याच्याकडून या आधारकार्डच्या आधारे सिमकार्ड खरेदी करायचे, सिमकार्डचे मोबाईल नंबरवरुन अॅमेझॉन व फ्लिपकार्ट या कंपन्यांकडून ऑनलाईन मोबाइल, टॅब, आयपॅड, लॅपटॉप अशा वस्तू ऑर्डर करायचे. कंपनीचा डिलेव्हरी बॉय या वस्तू देण्यास आल्यावर त्याचेकडून या वस्तूचा बॉक्स ताब्यात घेऊन त्यास पैसे मोजण्यात गुंतवून ठेऊन, तो पैसे मोजत असताना या वस्तूंचे पॅकींग बॉक्स त्यांचे साथीदार ताब्यात घेऊन त्या बॉक्सला कटरने कापून त्यातील वस्तू काढून घेऊन त्या ठिकाणी त्या वजनाचा दगड, कपडा पॅक करून पैसे कमी असल्याचे कारणावरुन नंतर पैसे देतो असे कारण सांगून या वस्तूचा बॉक्स डिलेव्हरी बॉयला परत करुन तो कंपनीस परत पाठविणेस सांगून, डिलेव्हरी बॉयकडून प्राप्त मोबाईल व इतर वस्तू कमी किमतीत बाजारात विक्री करीत असल्याचे आढळून आले आहे. आरोपी यांनी गुजरात, कलकत्ता राज्यातील विविध



शहरात तसेच महाराष्ट्र राज्यातील पुणे, मुंबई, सातारा, ठाणे, अलिबाग शहरात सदरचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

तसेच त्यांना यापुर्वी कराड, अलिबाग, कासार वडवली या पोलीस ठाणेत अशा प्रकारचे गुन्हे केल्याबद्दल अटक करण्यात आली असल्याची माहिती तपासात प्राप्त झाली आहे. आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर इतरही ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.काय याचा तपास पोलीस करीत आहेत. रॉबीन आरुजा (२८, रा. डोंबिवली पूर्व), किरण बनसोडे (२६), रॉकी कर्ण (२२), नवीनसिंग सिंग (२२) तिन्ही रा. कल्याणपूर्व तसेच अलोक यादव (२० रा. डोंबिवली पूर्व ) यांना अटक करण्यात आलेली आहे. आरोपींकडून ५,८५,१३६ रुपये किमतीचे २२ मोबाईल फोन, एक लॅपटॉप, एक आयपॅड, एक टॅब तसेच २० सिमकार्ड, २९ बनावट आधारकार्ड असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

यातील आरोपीत रॉबीन अॅन्टनी आरुजा हा इंजिनिअर आहे. तसेच आरोपी रॉकी दिनेशकुमार कर्ण हा कॉलसेंटरमध्ये नोकरी करीत आहे. आरोपी अलोक गुल्लु यादव हा सिमकार्ड विक्रेता असून, त्याचेकडून आरोपीत हे जास्त पैसे देऊन ग्राहकाची कोणतीही खात्री न करता सिमकार्ड खरेदी करून, त्याआधारे ऑनलाईन वस्तू ऑर्डर करुन, प्राप्त वस्तु बाजारात स्वस्त दरात विक्री करुन मिळालेल्या पैशातून मौजमजा करीत असायचे. ही कामगिरी कल्याण पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली आहे.

# नवी मुंबईतील दोन माजी नगरसेवकांसह सहा तालुकाध्यक्ष शिंदे गटात

## जनहिताची कामे प्राधान्याने पूर्ण करू; मुख्यमंत्री शिंदे यांचे आश्वासन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन या शासकीय निवासस्थानी येऊन युती सरकारला आपला पाठींबा जाहीर केला.

यात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाप्रमुख आणि माजी नगरसेवक अशोक गावडे, माजी नगरसेविका स्वप्ना गावडे, सानपाड्याचे तालुकाध्यक्ष रवींद्र ढोबळे, कोपरखैरणेचे तालुकाध्यक्ष मोहन पाडळे, घणसोलीचे तालुकाध्यक्ष हेमंत पाटील, सीबीडी बेलापूरचे तालुकाध्यक्ष अरुण कांबळे, रबाळेचे तालुकाध्यक्ष महेश बिराजदार, तुर्भेचे तालुकाध्यक्ष नियाज शेख यांचा समावेश आहे.

याशिवाय सामजिक न्याय महिला जिल्हाध्यक्ष सरिता कांबळे, माजी शिक्षण मंडळ समिती सदस्य अजित सावंत, जिल्हा सरचिटणीस दिलीप सिंह, सामजिक न्याय विभागाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कांबळे, शिवाजी गावडे, उपशहर अध्यक्ष राज नायर यांनीही शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिंदे गटाला आपला पाठींबा जाहिर केला. दरम्यान, नवी मुंबई शहर हे अतिशय सुंदर आणि सुनियोजित शहर आहे. मात्र तरीही या शहरात अनेक नागरी आणि पुनर्विकासाचे प्रश्न प्रलंबित आहेत. मी स्वतः नवी मुंबईतील नागरिकांना




दिलासा देण्यासाठी नगरविकास मंत्री असताना अनेक निर्णय घेतले असून त्याचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना झालेला आहे. यापुढेही नवी मुंबईतील विकासकामे प्राधान्याने पूर्ण करून नागरिकांना न्याय देऊ असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

या वेळी उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार रवींद्र फाटक, शिवसेना उपनेते विजय नहाटा, शिवसेना जिल्हाप्रमुख आणि प्रवक्ते नरेश म्हस्के, नवी मुंबईचे माजी विरोधी पक्षनेते विजय चौगुले, माजी नगरसेवक सुरेश कुलकर्णी आणि शिवसेनेचे नवी मुंबईतील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त

# आमदार मंदा म्हात्रेंच्या माध्यमातून महाआरोग्य शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून शनिवारी (दि. १७) सकाळी १० ते २ वाजेपर्यंत वारकरी भवन, से-३ए सीबीडी बेलापूर नवी मुंबई येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चँम्पियन यांच्या सहकार्याने तसेच हिरानंदानी फोर्टिस हॉस्पिटल-वाशी, स्पार्क्स लाईफ केयर, साई दृष्टी आय हॉस्पिटल-सानपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने या मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. शिबिरामध्ये रक्तदाब, डायबिटीस, बीएमआय, ईसीजी, डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मोफत औषधे, मोफत चष्मे, मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, आरोग्य सेवा हीच ईश्वर सेवा असून नागरिकांना ती मोफत उपलब्ध करून देणे हे एक लोकप्रतिनिधी म्हणून आपले प्रथम कर्तव्य आहे.

# पेणमधील वाशी येथे अपघातात मोटरसायकलस्वार जागीच ठार

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील अपघाताची मालिका सुरूच असून पुन्हा एकदा पेण तालुक्यातील वाशी नाका येथे ट्रेलर व मोटरसायकलच्या अपघातात मोटरसायकलस्वार जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे.

सविस्तर वृत्त असे की, मुंबई गोवा महामार्गावरून प्रकाश महादू पाटील (वय ४९, रा. कोपर) हे आपल्या मोटरसायकलवरुन (क्रमांक एम.एच.०६ बी.५९८८) सकाळी ९.३० च्या सुमारास गडब येथे जात होते. वाशीनाका येथे आले असता पाठीमागून येणाऱ्या ट्रेलरने (आरजे १९ जीजी २९४२) त्यांच्या गाडीला जोरदार धडक दिली. या अपघातात प्रकाश पाटील यांचा जागीच मृत्यू झाला.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-37/22-23 **7000024666** | Replacement of control and relay panels at 220kV Uran and 220kV JNPT substation under EHV (O&M) Dn. Panvel. | **Rs. 195.15 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee - Rs. 5000/- + GST Submission of bids from 16.09.2022 to 25.09.2022 up to 23:59 hrs, Opening date :- 26.09.2022 @ 11:00 Hrs.**
For further details visit our website
**https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8356921558 E-mail ID
**se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-38/22-23 **7000024701** | Supply, installation, Testing & commissioning of Microprocessor based Multifunction Digital Energy Meters alongwith its necessary software for Energy Auditing purpose and supply & installation of industrial PC at various S/stn. under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs.48.72 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 16.09.2022 to 23.09.2022 up to 23:59 hrs, Opening date:-24.09.2022 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No 9769006220. E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
Email : panvelcorporation@gmail.com

**ई-निविदा सुचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहे.

| अनु क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत(रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/विद्युत /५९/२०२२ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसीत केलेल्या खारघर नोड मधील पारंपारिक पथदिवे बदलून नवीन LED पथदिवे लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरूस्ती,सुधारणा व नुतनीकरण करणे. | १२,२७,६३,१८२/- | ५,५६,८६३/- | ३५४०/- |
| २. | पमपा/विद्युत /६०/२०२२ | पनवेल माहानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसीत केलेल्या कळंबोली नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलून नवीन LED पथदिवे लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरीता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरूस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे | ५,८२,७६,१३५/- | २,५३,४१२/- | ३५४०/- |
| ३. | पमपा/विद्युत /६१/२०२२ | पनवेल माहानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसीत केलेल्या कामोठे नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलून नवीन LED पथदिवे लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरीता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरूस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे. | ११,०९,३७,६१०/- | ४,८८,२४३/- | ३५४०/- |
| ४. | पमपा/विद्युत /६२/२०२२ | पनवेल माहानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसीत केलेल्या नवीन पनवेल ( पूर्व व पश्चिम) व काळुंद्रे नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलून नवीन LED पथदिवे लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्षे कालावधीकरीता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरूस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे. | ११,०९,३७,६१०/- | ४,८८,२४३/- | ३५४०/- |
| ५. | पमपा/विद्युत /६३/२०२२ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसीत केलेल्या तळोजा फेज-I, फेज-II व नावडे नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलून नवीन LED पथदिवे लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरूस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे. | ३,८१,५६,९९१/- | १,५२,८१६/- | २३६०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र/पमपा/विद्युत/९९२२/प्र.क्र.६७/७५४/२०२२
दिनांक १६/०९/२०२२

**सही/-**
**विद्युत विभाग प्रमुख**
**पनवेल महानगरपालिका**

# मुसळधार पावसाने पनवेलला झोडपले

## सलग दोन दिवस पर्जन्यवृष्टी; प्रशासकीय यंत्रणा सतर्क

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या २४ तासांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसाने पनवेलकरांना चांगलेच झोडपले आहे. मुसळधार पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असून महापालिकेच्या मालकीचे असणारे गाढेश्वर धरण तुडुंब भरून वाहत आहे.




पनवेल, नवी मुंबई परिसरात गेल्या २४ तासांपासून पावसाचा जोर वाढला आहे. गाढेश्वर धरणसुद्धा तुडुंब भरून वाहत असल्याने प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. असाच पाऊस पडत राहिल्यास पातळी ओलांडू शकते. अनेक नदी व नाले परिसरातून पाणी वेगाने वाहत असल्याने महानगरपालिका व शासकीय यंत्रणा घडामोडींकडे लक्ष ठेवून आहे व परिसरात कोठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा, अग्निशमक दल व आपत्कालीन पथक सज्ज आहे. या पावसाचा फटका चाकरमान्यांना पडला असून एसटी, एनएमएमटीच्या बसेस वाहतूक कोंडीमुळे धीम्या गतीने होत आहे.

कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्राच्या घाट भागात जोरदार पाऊस पडत आहे. शनिवारी अशीच परिस्थिती कायम राहणार आहे. अरबी समुद्रापासून मध्य आणि पूर्व भारताच्या दिशेने वारे वाहत आहेत. त्यामुळे पावसाचे प्रमाण अधिक आहे, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली.

### नवीन पनवेलमध्ये झाड कोसळले

***सतत कोसळणाऱ्या पावसामुळे पनवेलकरांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. या पावसामुळे नवीन पनवेल येथील के. आ. बांठीया शाळेजवळील असलेले भलेमोठे झाड पडले. या वेळी शाळा नुकतीच शाळा सुटली होती. त्यामुळे घटनेत सुदैवाने कोणतीही जीवीतहानी नाही झाली. दरम्यान हे झाड पडल्यामुळे रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्यांचे नुकसान झाले आहे.***



**पनवेल : पनवेलमधील सुमेध संजय कदम हा तरुण लंडनमधील ऑक्सफोर्ड ब्रुक्स युनिव्हर्सिटी हेडिंग्टन येथे एमएससी, ऑटोमोटिव्ह इंजिनिअरिंग विथ इलेक्ट्रिक वेहिकल्स या कोर्सचे उच्च शिक्षण घेणार आहे. याबद्दल भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी सुमेधला पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, सुमेधचे वडील संजय कदम उपस्थित होते.**

# सोनसाखळीचोरांना पोलिसांकडून अटक

### ८.५ लाख किमतीचा मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

महिलांचे सोनसाखळी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना तळोजा पोलीस गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून अटक करून त्यांच्याकडून सुमारे ८.५ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. या आरोपींच्या अटकेमुळे नऊ गुन्हे उघडकीस आले आहेत.



तळोजा पोलीस ठाणे येथे २०२२मध्ये एकूण चार चेनचोरीचे गुन्हे घडले. गुन्हे प्रकटीकरण पथकाने या गुन्ह्यांच्या तपासादरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात घडलेल्या सोनसाखळी चोरीचा तपशिल संकलीत केला. तांत्रिक तपास करून सोनसाखळी चोरणाऱ्या गुन्हेगारांची यादी तयार केली. सराईत गुन्हेगारांचा माग काढत असतांना तळोजा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो. ना. विजय पाटील यांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सोनवणे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) दत्तात्रय किंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तळोजा पोलीस ठाणे हद्दीत चेनचोरी करण्याच्या तयारीत बाहेर पडलेल्या दोन आरोपींना ताब्यात घेतले. त्यांची कसोशीने चौकशी केली असता आरोपींनी अलिकडील काळात चेन चोरीचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. आरोपींनी तळोजा, खारघर, कळंबोली, पनवेल, खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत एकूण नऊ गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. आरोपींच्या तीन दुचाकी व सुमारे ५,१७,५०० रुपये किमतीचे दागिने असा एकूण ८.५ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# जागृत युवकाने दानपेटी चोरीचा प्रयत्न हाणून पाडला

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर ११मधील महाकाली माता मंदिरातील दानपेटी चोरी करून पलायनाच्या तयारीत असताना एका जागृत युवकामुळे चोराचा प्रयत्न फसला. युवकास चोराची दुचाकी पकडण्यात यश आल्याची घटना खारघरमध्ये घडली. दानपेटी आणि दुचाकी पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.




खारघर सेक्टर-११मध्ये असलेल्या महाकाली माता मंदिरात कोणीही नसल्याची संधी साधून मंदिरातील दानपेटी फोडण्याचा प्रयत्न चोरटा करीत होता. या वेळी मंदिराजवळून खारघर सेक्टर-१२मध्ये जाणाऱ्या अजय इंगळे यास मंदिरातून आवाज आला. दानपेटी फोडण्यात यश न आल्याने चोरटा दानपेटी घेऊन मंदिराबाहेर पडण्याच्या तयारीत असताना, अजय इंगळेने चोरट्यास अडवून विचारणा केली, मात्र चोर समोरुन दमदाटी करू लागल्याने अजयने सतर्कता बाळगून चोराने आणलेल्या दुचाकीची चावी काढून घेतली. अजय पोलिसांना फोन करीत असल्याचे चोराच्या निदर्शनास येताच चोरट्याने दानपेटी आणि मोटार सायकल तिथेच सोडून पलायन केले.

या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दानपेटी आणि दुचाकी ताब्यात घेतली.

## गौरा गणेश दर्शन





**पनवेल : तालुक्यात गौरा गणपती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा झाला. त्यानिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कामोठे येथे भाजपे जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे यांच्या निवासस्थानी तसेच जय हनुमान मित्र मंडळाच्या वतीने आयोजित उत्सवाला भेट देऊन गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवि जोशी, भाजप नेते भाऊ भगत आदी उपस्थित होते.**

# 'सीकेटी'मध्ये विद्यार्थी बनले शिक्षक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात (सीकेटी) एनएसएसच्या माध्यमातून शुक्रवारी (दि. १६) इयत्ता १२वी कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी पूर्व प्राथमिक व इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना एक दिवस विद्यादानाचे कार्य केले.

या उपक्रमात २० मुलींनी शिक्षिकेची तर आठ मुलांनी शिक्षकाची भूमिका पार पाडली. या विद्यार्थी शिक्षकांनी गणित, इंग्रजी, मराठी, परिसर, संगीत, पीटी., चित्रकला, कराटे, गप्पागोष्टी इ. विषयाचे अध्यापन केले. आचल शेळके या विद्यार्थिनीने मुख्याध्यापिकेची तर ध्वनी सावंत हिने पर्यवेक्षिकेची भूमिका पार पाडली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना दैनंदिन अध्यापन करणारे शिक्षक त्यांची कार्य व जबाबदारी यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांचे अतिशय उत्तम सहकार्य लाभले. भविष्यात तुम्ही उत्तम शिक्षक बना असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे व प्रशांत मोरे यांचे मार्गदर्शन या उपक्रमासाठी लाभले. श्रवण कदम याने संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन केले.



# खांदा कॉलनी येथे उद्या रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात भाजपतर्फे सेवा पंधरवडा राबविण्यात येत आहे. या अंतर्गत पनवेल भारतीय जनता युवा मोर्चातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन खांदा कॉलनी येथे रविवारी (दि. १८) करण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल भारतीय जनता युवा मोर्चातर्फे रविवारी खांदा कॉलनी येथील रोटरी ब्लड बँक, सेक्टर १ येथे रक्तदान शिबिर सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत होणार आहे. शिबिरात जास्तीत जास्त दात्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन युवा मोर्चातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी अभिषेक भोपी (८३६९६५४९४९), गौरव कांडपिळे (९९२०८६८००८), आनंद ढवळे (९७७३९४७७७७) व विश्वजित पाटील (८१०८९९३४३९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : देशाचे यशस्वी व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात सेवा पंधरवड्यानिमित्त कार्यक्रमांच्या आयोजनासंदर्भात भाजप पनवेल शहर मंडलची बैठक गुरुवारी रात्री श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. या बैठकीस भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका चारुशीला शहर, दर्शना भोईर, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विविध उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १६) विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये व्यवस्थापन शिक्षण विभागातर्फे गुंतवणुकीची जोखीम व्यवस्थापन या आभासी व्याख्यान, माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे व्यक्तिमत्व विकास याविषयी परिसंवाद यासह रसायनशास्त्र विभागातर्फे तसेच अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व नवी मुंबई महाविद्यालय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन भित्तीपत्रक बनवण्याची स्पर्धा झाली.






आभासी व्याख्यानासाठी मनी वाईज वेल्थ प्लॅनरचे संचालक डॉ. संदीप सहस्त्रबुद्धे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी सेवानिवृत्तीनंतरच्या गुंतवणुकीच्या योजना व त्यांचे व्यवस्थापन कसे, तसेच स्टॉक मार्केटिंग मार्केटमध्ये गुंतवणूक करताना जोखीम समजून घेणे याबाबत मागर्दशन केले. व्याख्यानाचे आयोजन व्यवस्थापन शिक्षण विभाग प्रमुख प्रा. रीत ठुले यांनी केले. प्रा. भाग्यश्री शुक्ला यांनी सूत्रसंचालन तर प्रा. अंकिता जांगिड यांनी उपस्थितांचे ओळख करून दिली.

परिसंवादासाठी शिरीष यादव हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रमुख वक्त्यांनी विद्यार्थ्यांना बायोडेटा तयार करणे, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध सर्टिफिकेट कोर्सेसविषयी माहिती दिली. परिसंवादाचे आयोजन प्रा. मीनल मांडवे तसेच प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. स्नेहा लोखंडे, प्रा. महेश धायगुडे यांनी यशस्वीरित्या केले.

भित्तीपत्रक स्पर्धेचे परीक्षक म्हणून रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. महादेव चव्हाण व डॉ. अविनाश जुमारे यांनी काम पाहिले. स्पर्धेमध्ये २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन ओझोनच्या पातळीत होणारी घट थांबवण्यासाठीचे उपाय प्रदर्शित केले. या कार्यक्रमाचे आयोजन रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. महेश्वरी झिरपे यांनी केले, तसेच डॉ. दीपिका हसीजा, डॉ. नीलम लोहकरे व प्रा. रूपाली नागरेकर यांनी सहकार्य केले. प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी सर्व उपक्रमांसाठी प्रोत्साहन दिले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# पनवेलमध्ये आज हिंदू संघटन मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदु राष्ट्र स्थापनेचा आवाज बुलंद करण्यासाठी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने शनिवारी (दि. १७) सायंकाळी ५ वाजता पृथ्वी सभागृह शबरी हॉटेलच्या मागे, रोड क्र. २, सेक्टर १ एस, नवीन पनवेल येथे हिंदूसंघटन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या वर्षी २६ सप्टेंबर या दिवशी अर्थात घटस्थापनेच्या दिनी हिंदू जनजागृती समितीच्या स्थापनेला २० वर्षे पूर्ण होत आहेत. या द्विदशकपूर्तीनिमित्त देशभरात समितीच्या वतीने हिंदु राष्ट्र संकल्प अभियान राबविले जात आहे. हिंदू ऐक्यासाठी तसेच हिंदू राष्ट्रासाठी कृतीशील होण्यासाठी या हिंदूसंघटन मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी (८०८०२०८९५८) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




## संपादकीय


# पावसाचा पुन्हा तडाखा

**हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार राज्याच्या अनेक भागांत शुक्रवारी मुसळधार पाऊस कोसळला असून अनेक शहरी भागांत पाणी साचल्याने वाहतूककोंडीचा सामना करावा लागला तर धरण क्षेत्रांमध्येही साठलेल्या पाण्याचा निचरा काळजीपूर्वक करण्यासाठी नियोजन आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे. आणखी पावसाची शक्यता ध्यानात घेऊन अनेक ठिकाणी नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज आहे.**

**निसर्गापुढे माणसाचे शहाणपण चालत नाही. विकासाच्या नावाखाली मनुष्यप्राणी निसर्गाची हेळसांड करतो, त्याची किंमत कधी ना कधी मोजावीच लागते. हवामानातील बदल सारे जग अनुभवत आहे. त्याला कारणीभूत मानवाने निसर्गाच्या चक्रामध्ये केलेला हस्तक्षेप आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. भारत हा तसा मोसमी पावसाचा प्रदेश असला तरी गेल्या काही वर्षांत पावसामुळे होणारे नुकसान वाढीस लागले आहे हे खरे. महाराष्ट्र देखील त्यास अपवाद नाही. राज्याच्या काही भागांत येत्या तीन दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला होता. त्यानुसार शुक्रवारी राज्याच्या अनेक भागांना मुसळधार पावसाने चांगलेच झोडपून काढले. मुंबईसह आसपासच्या संपूर्ण परिसरात गुरूवारी मध्यरात्रीपासूनच जोरदार पावसाला सुरूवात झाल्याने शुक्रवारी सकाळी बहुतांश ठिकाणी नागरिकांना वाहतूककोंडीचा सामना करावा लागला. रस्त्यांवरील खड्डे आणि त्यातच मुसळधार पावसाने साचलेले पाणी यामुळे अत्यंत धिम्या गतीने गाड्या हाकण्याशिवाय चालकांना काही पर्यायच नव्हता. यंदाचा पाऊस आणखी प्रदीर्घ काळ रेंगाळण्याची शक्यता काही अहवालांतून यापूर्वीच व्यक्त झालेली आहे. तशी परिस्थिती उद्भवण्याची शक्यता ध्यानात घेऊन ठिकठिकाणच्या स्थानिक प्रशासनांनी रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम पावसातून उसंत मिळताच तातडीने हाती घेण्याची गरज आहे. युद्ध पातळीवर रस्ते दुरुस्तीची कामे हाती घेतली नाहीत तर येत्या महिन्याभरात वाहतुकीची परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाईल अशी भीती वाटते. हवामान खात्याकडून तीन दिवसांसाठी कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता तर विदर्भात पुढील सहा दिवस ओलेचिंब असतील अशी चिन्हे आहेत. शुक्रवारच्या एका दिवसात पावसाने मुंबईसह कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला तुफान झोडले. या एकाच दिवसात विक्रमी पाऊस झाल्याची नोंद आहे. आणि येत्या एक-दोन दिवसांत आणखी पावसाचीही शक्यता आहे. त्यामुळेच ग्रामीण भागांमध्ये जिथे-जिथे धरणांमधील पाणीसाठा धोक्याची पातळी ओलांडून पुढे गेला आहे, तिथे-तिथे आतापासूनच नियोजनबद्ध रीतीने पाण्याचा निचरा करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. सततच्या पावसामुळे नाशिक, पुणे आदी परिसरातील भाजीउत्पादक शेतकरीही मोठ्या प्रमाणात हवालदिल झाला आहे. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. फळपिकेही या पावसामुळे धोक्यात आली असून सतत महागड्या औषधांची फवारणी करणे शेतकऱ्यांना भाग पडते आहे. परतीच्या पावसाने पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी सुरू झाली आहे. महानगरांकडे जाणाऱ्या महामार्गांवरील वाहतुकीच्या बोजवाऱ्यामुळे आणि अपेक्षेपेक्षा जास्त पाऊस झाल्यामुळे शहरी भागांत भाज्यांची आवक बरीच घटली आहे. परिणामी पुन्हा भाज्यांचे दरही चांगलेच वधारण्याची शक्यता आहे. आभाळातून पावसाचा मारा आणि जमिनीवर महागाईचा मारा अशा दुहेरी कात्रीत सापडलेल्या सामान्य माणसासमोर सणासुदीच्या दिवसांत या परिस्थितीचा सामना करण्याचे आव्हान आहे.**

# 'व्हायब्रंट' नरेंद्र मोदी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे २०१४मध्ये देशाचा कार्यभार स्वीकारल्यापासून सर्वंकष आणि सर्वसमावेशक विकासाच्या मार्गावर देशाची वाटचाल सुरू झाली आहे. विकास हा सर्व तळागाळापर्यंत पोहचला पाहिजे हेच त्यांना अभिप्रेत आहे. आज त्यांचा जन्मदिवस आहे. या निमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...**



इतकी वर्षे आपण आपले भाग्य बदलण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. तो क्षण आता आला आहे. आपण घेतलेली प्रतिज्ञा आज पूर्ण होत आहे. आज एका युगाचा अंत होणार आहे. जे यश आपल्याला साजरे करायचे आहे, ते आपल्यापासून आता केवळ एक पाऊल दूर आहे. पण यापेक्षाही मोठे यश आणि संधी आपली प्रतिक्षा करत आहे. पं. जवाहरलाल नेहरू यांचे १४ ऑगस्ट १९४७च्या रात्रीचे हे भाषण आहे. भारतासाठी स्वातंत्र्याचा सूर्य उगवण्यापूर्वीचा हा दिवस होता. 'ट्रिस्ट विद डेस्टनी' नावाने गाजलेल्या या ऐतिहासिक भाषणात देशाचे पहिले पंतप्रधान बनलेले पं. नेहरू पुढे म्हणाले होते, आपल्याला आता भारताची म्हणजेच येथील करोडो पिडितांची सेवा करायची आहे. अज्ञान, दारिद्र्य, रोगराई यांचा नायनाट करून असमानता दूर करायची आहे, जेणेकरून, एक सुखी, संपन्न, लोकतांत्रिक आणि प्रगतिशील देश आपण निर्माण करू शकू. आज त्या घटनेला ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना या त्यांच्या भाषणाचे महत्त्व आज विषेशत्वाने जाणवते आहे. १९४७ साली देशाने ज्या मुलभूत मुद्द्यांसोबत विकासाच्या मार्गावर चालण्याचे उद्दिष्ट ठेवले होते, ती वाट कुठपर्यंत आली, ती उद्दिष्टे साध्य झाली अथवा नाही, याचे विश्लेषण करण्याची गरज आज जाणवते आहे. या पंचाहत्तर वर्षात देशाने पंधरा पंतप्रधान पाहिले. पण एक नरेंद्र मोदी वगळता इतर कोणत्याही पंतप्रधानाने पं. नेहरू यांच्या या देशविकासाच्या वाटेवर चालण्याचे प्रयत्न फारसे निकराने केल्याचे दिसत नाही. अतिशय धिम्या गतीने होत असलेल्या विकासाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली ती २०१४ साली नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर.

'सबका साथ, सबका विकास' हे सूत्र डोळ्यासमोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काम करायला सुरुवात केली. दारिद्र्य, अज्ञान, रोगराई व असमानतेचे समूळ उच्चाटन करून देशाला आर्थिक, सामाजिक, भौतिक विकास साधून आत्मनिर्भर राष्ट्र निर्माण करण्याचा त्यांनी ध्यास घेतला. त्याआधी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी जसे, 'व्हायब्रंट गुजरात' च्या माध्यमातून ऑटोमोबाईल, रसायने, पेट्रोकेमिकल, अक्षय ऊर्जा, अशा विविध क्षेत्रातील उत्पादनांचे केंद्र स्थापित करत गुजरातचा आर्थिक, पायाभूत विकास साधला, तेच धोरण त्यांनी देशाच्या बाबतीतही स्वीकारले. 'व्हायब्रंट भारत'चे स्वप्न त्यांनी जनतेच्या मनावर बिंबवले. देशातील नद्यांचे स्वच्छताकरण असो, स्मार्ट शहरे, प्लास्टीकमुक्त पर्यावरण, झाडे लावा-झाडे जगवा असो की शैक्षणिक, व्यापार, लघु व्यापाऱ्यांचे बळकटीकरण असो किंवा मग राष्ट्रीय महामार्गाचे देशात जाळे अशा प्रत्येक क्षेत्रात त्यांनी भारताला 'व्हायब्रंट' करण्याचा ध्यास घेतला.

नरेंद्र मोदी यांनी युवा वर्गाला उद्योजकतेकडे वळण्यासाठी आणि भावी पिढीला नवनव्या क्षेत्रांमध्ये अधिक रंजक उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहित केले. समान संधी उपलब्ध असणाऱ्या वातावरणात शाश्वत आर्थिक विकासाची राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांनी अनेक सुधारणा केल्या. उदयोन्मुख व्यवसायांना प्रोत्साहन देत, उद्योजक आणि खासगी उद्योगांना अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. करांच्या आकारणीशी संबंधित भ्रष्टाचार समाप्त करण्यासाठी एकच राष्ट्रव्यापी वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) संपूर्ण देशभरात लागू करण्यासाठी पुढाकार घेतला. जीएसटी डिजिटल पद्धतीने भरता यावा, याची तरतूद करून करचोरीला आळा घातला, जास्तीत जास्त उद्योगांना करकक्षेत आणले, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करासाठी करयंत्रणेचे सुलभीकरण, देशांतर्गत उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि आत्मनिर्भरतेवर भर देण्यासाठी पीएलआय योजना, श्रमसंबंधी कायद्यांचे सुलभीकरण, दिवाळखोरी निराकरणासाठी यंत्रणेची तरतूद आणि विविध क्षेत्रांचे विनिमयन असे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय मोदी सरकारने घेतले.

जास्तीत जास्त उद्योगांना एमएसएमई च्या कक्षेत आणणे, अधिक वित्तीय समावेशन, एमएसएमई आणि कौशल्य विकसनासाठी औपचारिक वित्तीय यंत्रणा उपलब्ध करून देणे अशा उपायांबरोबरच त्यांनी एमएसएमई साठीच्या गुंतवणूक आणि उलाढाल मर्यादेत वाढ करणे, एमएसएमईचा एक घटक म्हणून घाऊक आणि किरकोळ व्यापाराला सामावून घेणे, मुद्रा कर्ज आणि जनधन खाते, एमएफआय कर्ज आणि ईसीएलजीएसच्या माध्यमातून वित्तीय समावेशनात सुधारणा अशा काही उपाययोजना केल्या.

युपीआय सहा डिजिटल पेमेंट सिस्टमची निर्मिती, हा एक महत्त्वाचा निर्णय म्हणता येईल. जगभरातील तज्ज्ञांनी, सर्वाधिक कार्यक्षम अशा यंत्रणेचे तोंडभरून कौतूक केले आहे. कोविड-१९ साथरोगाच्या काळात मोदी सरकारने सर्वात मोठ्या वित्तीय सहाय्याची तरतूद केली. स्टार्ट अप क्षेत्रासाठी आश्वासक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने केले गेलेले प्रयत्नदेखील वाखाणले गेले. भारताला आत्मनिर्भर बनविण्यासाठी मोदी सरकारने लँड, लेबर, लिक्विडिटी आणि लॉ या चार 'एल'वर जोर दिला. त्यातून कुटीर, गृह, लघु-मध्यम उद्योगांना गती मिळाली असून त्यात करोडो लोकांचे हीत दडलेले आहे. भारताची अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, यंत्रणा, भौगोलिक स्थिती, मागणी-पुरवठा साखळी या पंचसूत्रीला मजबूत करण्यावर भर देत देशाला आत्मनिर्भरतेकडे नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

उत्पादन क्षेत्रात भारताला महासत्ता म्हणून उभे करण्यासाठी मेक इन इंडियाच्या माध्यमातून नवीन कार्यपद्धती अंगिकारली गेली आहे. परवानारहित व नियंत्रण विरहीत व्यवस्था निर्माण करून उद्योग विकासासाठी अत्याधुनिक व सुविधायुक्त पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे देशातीलच नव्हे तर परदेशातील उद्योग क्षेत्रातही मोदी सरकार प्रशंसेस पात्र ठरले आहे. मोदी सरकारने राबवलेल्या विविध योजना, धोरणे आणि घेतलेल्या निर्णयांमुळे भारताचा आर्थिक विकास दर झपाट्याने वाढतो आहे. कोविडसारखी महामारी आणि रशिया-युक्रेन युद्धाच्या झळांनी इतर सर्व देश पोळले जात असताना भारताने मात्र योग्य वेळी योग्य ते निर्णय घेऊन त्याच्या नकारात्मक प्रभावापासून देशाचे संरक्षण केले. त्यामुळेच आज देशाने जागतिक स्तरावर आर्थिक विकासात इंग्लंडला मागे टाकत पाचव्या क्रमांकावर पोहोचण्याचा मान पटकावला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालात असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे की, २०३० सालापर्यंत भारत हा जगातली तिसऱ्या क्रमांकाचा आर्थिक महासत्ता म्हणून आपले स्थान निश्चित करेल. मागील आठ वर्षांतील मोदी सरकारच्या कार्याचे केवळ देशातच नाही तर विदेशातही कौतूक होत आहे. नरेंद्र मोदी यांचे नेतृत्त्व 'व्हायब्रंट' आहे. त्यांच्यातला उत्साह, अदम्य इच्छाशक्ती, ज्ञानाची प्रगल्भता, कठोर परिश्रम, विकासाची भूक, राष्ट्रभक्तीची चाड, गरिबांचे कल्याण साधण्याची वृत्ती वाखाणण्याजोगी आहे.

संघाच्या संस्कारातून पुढे आलेले त्यांचे हे नेतृत्त्व राष्ट्रभक्तीच्या विचारांनी प्रभावित आहे. जनतेचा, देशाचा सेवक अशी आपली प्रतिमा निर्माण करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपले जीवन लोककल्याणासाठी वाहून घेतले आहे. त्यांच्या या देशसेवेच्या कार्याला आज सलाम करताना मी त्यांना दीर्घायू चिंतितो.

**-मिलिंद कानडे**

(लेखक हे भारतीय जनता पक्षाच्या आर्थिक प्रकोष्ठ सेलचे संयोजक आहेत.)

# गतिशील, समर्पित आणि दृढनिश्चयी पंतप्रधान

**नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली आणि स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेले ते भारताचे पहिले पंतप्रधान बनले. गतिशील, समर्पित आणि दृढनिश्चयी पंतप्रधान मोदी एक अब्जाहून अधिक भारतीयांच्या इच्छा आणि आकांक्षा प्रतिबिंबित करतात...**


मे २०१४ मध्ये कार्यभार स्वीकारल्यापासून पंतप्रधान मोदी यांनी सर्वंकष आणि सर्वसमावेशक विकासाच्या अशा मार्गावर वाटचाल सुरू केली आहे. जिथे प्रत्येक भारतीय त्याच्या आशा-आकांक्षा पूर्ण होऊ शकतील. अंत्योदय अर्थात शेवटच्या व्यक्तीपर्यंत सेवा पोहोचवून त्याचा विकास करण्याच्या तत्त्वाने ते सर्वाधिक प्रेरित आहेत.

अभिनव कल्पना आणि उपक्रमांच्या माध्यमातून प्रगतीची चाके जलद गतीने फिरतील आणि विकासाची फळे प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचतील याची सरकारने खबरदारी घेतली आहे. सरकार आता अधिक खुले, सुलभ आणि पारदर्शक बनले आहे.

देशाच्या आर्थिक व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरिक सहभागी व्हावा, यासाठी प्रधानमंत्री जन धन योजना आमुलाग्र बदल घडवून आणणारी ठरली. व्यापार सुलभ बनवण्यावर भर देण्याबरोबरच त्यांच्या 'मेक इन इंडिया' या आवाहनामुळे गुंतवणूकदार आणि उद्योजकांमध्ये अभूतपूर्व उत्साह संचारला. श्रम सुधारणा आणि 'श्रमेव जयते' उपक्रमांतर्गत श्रम प्रतिष्ठेमुळे लघु आणि मध्यम उद्योगांमधील अनेक कामगारांचे सशक्तीकरण झाले तसेच आपल्या कुशल युवकांनादेखील प्रोत्साहन मिळाले.

भारत सरकारने येथील जनतेसाठी तीन सामाजिक सुरक्षा योजना सुरू केल्या आणि त्याचबरोबर ज्येष्ठांना निवृत्तीवेतन आणि गरीबांना विम्याचे कवच देण्यावर भर दिला. जुलै २०१५ रोजी पंतप्रधानांनी 'डिजिटल इंडिया' अभियानाचा शुभारंभ केला. जनतेच्या जीवनमानात गुणात्मक बदल करण्यासाठी तंत्रज्ञानाचा कल्पक आणि अधिकाधिक वापर करणारी ही योजना आहे.

२ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधींच्या जयंतीदिनी पंतप्रधानांनी 'स्वच्छ भारत अभियान' सुरू केले, जी संपूर्ण देशात स्वच्छतेसाठी एक लोक चळवळ ठरली आहे. या अभियानाची व्याप्ती आणि प्रभाव ऐतिहासिक आहे. नरेंद्र मोदींच्या परराष्ट्र धोरणाशी संबंधित निर्णयांमुळे जागतिक व्यासपीठावर जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताची खरी क्षमता आणि भूमिका समोर आली आहे. त्यांनी सार्क देशांच्या सर्व राष्ट्रप्रमुखांच्या उपस्थितीत आपल्या कार्यकाळाची सुरुवात केली. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत त्यांनी केलेल्या भाषणाची जगभरात प्रशंसा झाली.



नरेंद्र मोदी हे भारताचे पहिले पंतप्रधान आहेत, ज्यांनी १७ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर नेपाळचा, २८ वर्षांनंतर ऑट्रेलियाचा, ३१ वर्षांनंतर फिजीचा आणि ३४ वर्षांनंतर सेशेल्सचा द्विपक्षीय दौरा केला. पदभार स्वीकारल्यानंतर नरेंद्र मोदी संयुक्त राष्ट्र, ब्रिक्स, सार्क आणि जी-२० शिखर परिषदेला उपस्थित राहिले, जिथे विविध जागतिक, आर्थिक आणि राजकीय मुद्यांवरील भारताच्या भूमिकेची आणि मतांची व्यापक प्रमाणात प्रशंसा झाली. त्यांच्या जपान दौऱ्यामुळे भारत-जपान संबंधांचे नवीन पर्व सुरू झाले.

मंगोलियाला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान बनले आणि त्यांचा चीन आणि दक्षिण कोरियाचा दौरा भारतात गुंतवणूक आकर्षित करण्यात यशस्वी ठरला. त्यांच्या फ्रान्स आणि जर्मनी दौऱ्यादरम्यान युरोपबरोबर त्यांची सातत्यपूर्ण चर्चा सुरू असल्याचे जाणवले.

अरब राष्ट्रांशी भारताचे संबंध अधिक दृढ करण्यावर मोदी यांनी भर दिला आहे. ऑगस्ट २०१५मध्ये त्यांनी आखाती देशांचा दौरा केला. आखाती देशात ३४ वर्षांत दौरा करणारे ते पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरले. आखाती देशांशी आर्थिक संबंध बळकट करण्यावर त्यांनी या दौऱ्यात भर दिला. जुलै २०१५मध्ये मोदी यांनी पाच मध्य आशियाई देशांचा दौरा केला. त्यांचा हा दौरा अनेक दृष्टीने पथदर्शी मानला जातो. ऊर्जा, व्यापार, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रांशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण करारांवर या दौऱ्यादरम्यान स्वाक्षऱ्या झाल्या.

ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान टोनी अबॉट, चीनचे राष्ट्रपती शि जिनपिंग, श्रीलंकेचे राष्ट्रपती मैत्रीपाल सिरिसेना आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यासह जगातील अनेक नेत्यांनी मोदी यांच्या पंतप्रधान कार्यकाळात भारताचा दौरा केला आणि त्यांच्या या दौऱ्यामुळे या सर्व देशांबरोबर भारताचे सहकार्य सुधारण्यास मदत झाली. भारत आणि अमेरिका संबंधांच्या इतिहासात प्रथमच २०१५च्या प्रजासत्ताक दिनाला राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले.

ऑगस्ट २०१५मध्ये भारताने प्रशांत द्वीपसमूह राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे यजमानपद भूषविले. प्रशांत द्वीपराष्ट्रांमधील महत्त्वाचे नेते या परिषदेत उपस्थित होते. भारत आणि प्रशांत द्वीपराष्ट्रांमधील महत्वाच्या मुद्यांवर या वेळी चर्चा झाली.

एखादा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याच्या नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला संयुक्त राष्ट्र परिषदेत जबरदस्त प्रतिसाद मिळाला. प्रथमच जगभरातील १७७ देशांनी एकत्र येऊन २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्र परिषदेत पारित केला.

गुजरातमधील लहान शहरात १७ सप्टेंबर १९५० रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे कुटुंब समाजातील शोषित आणि वंचित असणाऱ्या 'इतर मागासवर्गीय' गटातील होते. गरीब परंतु प्रेमळ कुटुंबात त्यांचे बालपण गेले, त्यांच्याकडे कधी जास्तीचा एक रुपयासुद्धा नसायचा. आयुष्यातील सुरुवातीच्या हलाखीच्या परिस्थितीने त्यांना कठोर परिश्रमाचा धडा दिला, मात्र त्याचबरोबर सामान्य जनतेच्या टाळता येण्याजोग्या हालअपेष्टांची त्यांना जाणीव झाली. यातूनच तरुण वयात देशासाठी आणि जनतेच्या सेवेत स्वत:ला वाहून घेण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. सुरुवातीच्या काळात, त्यांनी राष्ट्रनिर्माणासाठी समर्पित राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) या राष्ट्रवादी संघटनेबरोबर काम केले. त्यानंतर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर भारतीय जनता पार्टी संघटनेबरोबर काम करताना त्यांनी स्वत:ला राजकारणात झोकून दिले. गुजरात विद्यापीठातून मोदी यांनी राज्यशास्त्रात एमएचे शिक्षण पूर्ण केले.

वर्ष २००१मध्ये ते गुजरातचे मुख्यमंत्री बनले. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी विक्रमी चार कार्यकाळ पूर्ण केले. विनाशकारी भूकंपाच्या दुष्परिणामांचा सामना करणाऱ्या गुजरातचा त्यांनी विकास इंजिनाच्या रुपात कायापालट केला आणि आज हे राज्य भारताच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.

नरेंद्र मोदी हे एक 'लोकनेते' आहेत. लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा आणण्यासाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले आहे. त्यांना लोकांमध्ये राहायला, त्यांच्या आनंदात सहभागी व्हायला आणि त्यांची दु:खं दूर करण्यात समाधान मिळते.

लोकांशी थेट संपर्काबरोबरच ऑनलाईन संवादाचीही ते जोड देतात. भारताचे सर्वाधिक टेक्नो-सॅव्ही नेते म्हणून त्यांची ओळख आहे. लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी ते वेबचा वापर करतात. राजकारणाव्यतिरिक्त नरेंद्र मोदींना लेखनाची आवड आहे. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली असून त्यात कवितांचाही समावेश आहे. ते आपल्या दिवसाची सुरुवात योग साधनेतून करतात. योग केल्यामुळे त्यांचे शरीर आणि मन संतुलित राहते आणि अतिशय धकाधकीच्या दैनंदिन जीवनात त्यांना शांतीची अनुभूती मिळते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे साहस, करूणा आणि विश्वासाची साकार मूर्ती आहे. भारताचे नवनिर्माण करण्याच्या तसेच त्याला जगासाठी दीपस्तंभ बनवण्याच्या विश्वासापोटी भारतीयांनी त्यांना आपला जनादेश दिला आणि तो विश्वास सार्थ ठरवत आहे. असे जगातील श्रेष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**-जयंत पगडे**

अध्यक्ष, पनवेल शहर भाजप मंडल

# प्रभावशाली नेता पंतप्रधान नरेंद्र मोदी

**भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेची व्याख्या बदलून जगात नाव मिळविणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**

नेतृत्व हे राजाच्या पोटी जन्माला येत या कल्पना भ्रामक असतात, त्यासाठी अंगात त्याग समर्पण अन् कर्तृत्व लागत हे नरेंद्र मोदी यांनी सिद्ध करून दाखविले आणि भारताच नेतृत्त्व जगाच्या समोर बाणेदारपणे पेश केले. विविध क्षेत्रात जग आपल्या देशाकडे आधार म्हणून पाहायला लागले. हे मोदींच्या धोरणांचे त्यांच्या कर्तबगार कारकिर्दीचे यश आहे.

नरेंद्र मोदी हे स्वत:च्या जगण्याच्या पद्धतीने घरातील लोकांच्या साधेपणाने विरोधकांची बोलती बंद झाली. त्यांच्या घरातील एकही व्यक्ती शासनाचा लाभार्थी म्हणून कोणत्या महामंडळावर नाही की, कुठल्या राज्यसभेवर गेला नाही अन् ही आपल्या देशाची फार मोठी सामाजिक ठेव आहे. विरोधी लोकात आपण पाहतो की, आपली मुले, मुली जावई पुतण्या पदावर राहावा हा हव्यास सुटत नाही अशावेळी मोदी यांचे नेतृत्त्व उठून दिसते आणि विरोधकांची लाचारी लालची वृत्ती उघडी पडते.

कोरोनाचा महाभयंकर काळ आपण अनुभवला जग अजूनही त्याच्याशी लढा देत आहे. कोरोना काळ जगात साऱ्या मानवाचे हाल हाल करून गेला, परंतु भारतीय लोकांना केंद्राकडून कोठार खुली करण्यात आली रेशन दुकानात मुबलक साठा तयार ठेऊन मोदींनी हे राष्ट्र कल्याणकारी असल्याचे सिद्ध केले.

याशिवाय पीपीई किट, औषधे, बेड उपलब्ध करून देत लसीकरण सुद्धा जगात सर्वाधिक वेगाने पूर्ण करून विश्वाला एक संदेश दिला भारत आता बदललाय तो तुमच्या सोबत बलशाली राष्ट्र म्हणून उभा राहतोय.

दहशतवादाचा प्रश्न अनेक वर्षे डोळेझाक करून बघितला जायचा ३७० कलम सोबत सुधारणांचे धोरण आता या खोऱ्यात राबवले जात आहे, म्हणूनच लाल चौकात तिरंगा डौलाने फडकत आहे. हे केवळ राष्ट्राची निष्ठा यातून मिळालेले यश आहे.

शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेतून वार्षिक पेन्शन दिली जाते हे भारताच्या इतिहासात सर्वात प्रथम मोदींनी केले. शेतकऱ्यांचे कैवारी नुसतेच हिंडत फिरत राहिले लवासा मगरपट्टा चापडचत राहिले त्यांना कधीही शेतकऱ्यांच्या हिताची फाईल सापडली नाही मोदींनी ती नस ओळखली आज आपल्याकडे सर्वांना हा लाभ मिळत आहे. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय धोरणात सुद्धा भारताचे नाव अग्रक्रमामध्ये घेतले जाते.

आजुबाजूचे देश नांगी टाकून असतात. भारत अनेकांना मदत करत असतो. सर्वांशी सलोखा टिकवत असतो म्हणूनच आमची धोरणे उदार ठेवण्यात आली आहेत. मोदींनी देशासाठी समर्पण ठेऊन काम करत असल्याने विरोधकांना मुद्दाच राहिलेला नाही. विरोधकांनाही त्यांच्या कार्याची दखल घ्यावीच लागेल. मोदींनी देशाला आणखी बळकट, संपन्न करावे, भरभराट करावी यासाठी त्यांच्या पुढील कार्यासाठी लाख लाख शुभेच्छा!

**-विद्या प्रकाश तामखडे**

उत्तर रायगड जिल्हा महिला अध्यक्षा भारतीय जनता पार्टी भटके विमुक्त आघाडी

# कर्जत तालुक्यात 'लम्पी'चा प्रादुर्भाव

■ खांडस, वावे, आंबिवली गावांतील जनावरांमध्ये आढळली लक्षणे

■ पशुसंवर्धन विभागाकडून खबरदारी घेण्याच्या सूचना



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील खांडस, वावे, आंबिवली आणि इतर दोन गावामधील काही जनावरांमध्ये गेल्या दोन दिवसांत लम्पीसदृश्य रोगाची लक्षणे आढळून आली. त्याबाबत स्थानिक पशुवैद्यकीय दवाखान्यांमार्फत कर्जत पंचायत समिती आणि जिल्हा प्रशासनास अहवाल देण्यात आला आहे, तसेच रक्तजल व इतर आवश्यक नमुने पुणे येथील प्रयोग शाळेमार्फत भोपाळ येथील केंद्रीय प्रयोग शाळेत पाठवण्यात आले आहेत. दरम्यान, लम्पीची लागण झालेल्या जनावरांना विलगिकरणामध्ये ठेवण्यात आले आहे.

रायगड जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, उपायुक्त रत्नाकर काळे, आणि सहआयुक्त राजेश लाळगे यांनी कर्जत तालुक्याला तातडीने भेट देऊन लम्पीची लागण झालेल्या जनावरांची पहाणी केली व तालुक्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांना आवश्यकत्या सूचना केल्या. त्यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. गिरीष बराडकर, कर्जत पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. मिलिंद जाधव व स्थानिक पशुवैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

लम्पीची लागण झालेल्यांपैकी बहुसंख्य जनावरे पशुपालकांनी १५-२० दिवसांपूर्वी रायगड जिल्ह्या बाहेरून आणली असल्याचे आढळले आहे. डॉ. रत्नाकर काळे व डॉ. शामराव कदम यांनी पशुसंवर्धन विभागातील कर्जतमधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक मार्गदर्शन हे केले आहे. स्थानिक पशुवैद्यकीय दवाखाने व इतर तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी यांच्या पथकाने लम्पी रोगाची जनावरे आढळलेल्या गावांमधील इतर जनावरांची आरोग्य तपासणी व लम्पीबाधीत जनावरांवर मोफत औषधोपचार मोहीम सुरू केली आहे, तसेच खांडस, वावे, आंबिवलीसह कर्जत तालुक्यातील इतर गावांमध्ये गोचीड, गोमाश्या, चिलटे, मच्छरांचे निर्मुलन करण्याबाबत पशुपालकांना आवाहन करण्यात येत आहे.

> **लम्पी रोगाचा रोगाचा प्रसार टाळण्यासाठी पशुपालकांनी पशुधनाची आवश्यक ती सर्व काळजी घ्यावी. आपल्या जनावरामध्ये लम्पीसदृश्य लक्षण आढळल्यास तात्काळ स्थानिक पशुवैद्यकीय दवाखाना किंवा पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा.**
>
> -डॉ. मिलिंद जाधव, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती-कर्जत

> **सद्यस्थितीत पशुपालकांनी जनावरांची वाहतूक किंवा नवीन जनावरे आपल्या गोठ्यात आणणे टाळावे.**
>
> -डॉ. गिरीष बराडकर, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन विभाग कर्जत

## गतिमंद मुलीवर बलात्कार; नराधमास २० वर्षे कारावास

**अलिबाग : प्रतिनिधी**

गतिमंद मुलीवर बलात्कार केल्याच्या गुन्ह्याप्रकरणी अलिबाग येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. के. मणेर यांनी आरोपीस २० वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

अलिबाग तालुक्यातील शिरवली गावात जानेवारी २०१७मध्ये हा गुन्हा घडला. पीडित मुलगी (वय २०) ही गतिमंद आहे, हे माहीत असताना आरोपीने तिच्याबरोबर शारीरिक संबंध ठेवले. वारंवार झालेल्या लैंगिक संबंधामुळे ती मुलगी गरोदर राहिली. ही बाब पीडित मुलीच्या आईच्या लक्षात येताच तिने आरोपीविरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक जी. एल. शेवाळे यांनी तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

शासकीय अभियोक्ता भूषण साळवी यांनी या खटल्यात १३ साक्षीदार तपासले त्यात फिर्यादी, स्वतः पीडित मुलगी आदींची साक्ष महत्त्वाची ठरली. अ‍ॅड. भूषण साळवी यांनी सरकार पक्षातर्फे केलेला युक्तिवाद महत्त्वपूर्ण ठरला. सर्व साक्षी, पुरावे आरोपीविरोधात सिद्ध झाल्याने आरोपीला भादवि कलम ३७६(एन), ३२३, २४, कलमांतर्गत दोषी ठरवून २० वर्षांची शिक्षा व ५० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मे. सिडकोमार्फत त्यांच्याकडील १२.५ टक्के योजनेअंतर्गत मुळ भुखंडधारक **१) मयत कै. गंगाराम आत्माराम म्हात्रे यांचे वारस (१:१) प्रकाश गंगाराम म्हात्रे, (१:२) रमाकांत गंगाराम म्हात्रे, (१:३) लक्ष्मीबाई बाळकृष्ण तारेकर, (१:४) लताबाई अरुण पाटील, (१:५) कांता पद्माकर पाटील, (१:६) सावित्री कमळाकर पाटील, (२) मयत कै. तुळशीराम आत्माराम म्हात्रे यांचे वारस (२:१) सदानंद तुळशीराम म्हात्रे, (२:२) हरिश्चंद्र तुळशीराम म्हात्रे, (२:३) लिलाबाई उर्फ तुलसाबाई तुळशीराम म्हात्रे, (२:४) मुरलीधर तुळशीराम म्हात्रे, (२:५) उदय तुळशीराम म्हात्रे, (२:६) अलका शरद कडू, (२:७) प्रमिला रामनाथ पाटील, (२:८) मयत कै. अशोक तुळशीराम म्हात्रे यांचे वारस (२:८:१) सुजाता अशोक म्हात्रे,** यांच्या लाभांत सिडको संचिका क. उलवे - १ आय - १५८ - दापोली अंतर्गत भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या भुखंडांचे त्यांच्याकडून मे. सिडकोकडून भुखंड हस्तांतरणासंदर्भातील पुर्वपरवानगी घेऊन हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे-

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भूखंड क. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड | ए - ६ | १६ | ९०० चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडांचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पूर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करुन घेण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडांचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भुखंडांवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्या तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा-याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या आत** सादर करावे,आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचे भुखंड हे सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहु भुखंडासंदर्भातील संपूर्ण व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/-**
**अ‍ॅड. धनंदा प्रदिप मोकल-ठाकूर**

**पत्ता :** शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८


## अग्निशमन वाहनाची प्रतीक्षा कायम!

### दोन वर्षांनंतरही माणगाव नगरपंचायतीकडे वाहन आलेच नाही, नागरिकांत नाराजी

**माणगाव : प्रतिनिधी**

अत्याधुनिक व सुसज्ज अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी माणगाव नगरपंचायतीला जिल्हा नियोजनातून निधी मंजूर आहे. गेल्या दोन वर्षापासून या अग्निशमन वाहनाची येथील नागरिक प्रतीक्षा करीत असून, ते वाहन अद्यापपर्यंत नगरपंचायतीकडे आले नसल्याने नागरिकांत नाराजीचा सूर आहे.

माणगाव नगरपंचायतीला शीघ्र प्रतिसाद क्यूआरव्ही वाहन तथा अग्निशमन वाहन आवश्यक यंत्रसामुग्रीसह खरेदी करण्यासाठी २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता जिल्हा नियोजनमधून तीन कोटी १७ लाख ८१ हजार रुपये मंजूर करण्यात आले होते, मात्र तब्बल दोन वर्षे झाले, अजूनही हे वाहन माणगाव नगरपंचायतीत आलेले नाही.

हे वाहन नुसते आग विझविण्यापुरते मर्यादित नाही. या अत्याधुनिक व सुसज्ज वाहनात १२५ विविध प्रकारच्या यंत्रसामुग्रीचा समावेश आहे. पूरग्रस्त परिस्थितीत मदतीसाठी पाण्यातील शोध घेणारे कॅमेरे, बिल्डिंग व दरडग्रस्त नैसर्गिक आपत्तीतील मदतीसाठी व्हिक्टीम लोकेशन कॅमेरा आदी यंत्रणाची बसवण्यात आली आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीशी सामना करण्यासाठी हे वाहन उपयोगी पडणार आहे. अशा प्रकारणचे रायगड जिल्ह्यातील हे पहिलेच अग्निशमन वाहन असून ते वाहन बनवण्याचे काम एका ठेकेदारामार्फत सुरु आहे.



हे वाहन उभे करण्यासाठी लागणारी जागा (केंद्र), अधिकारी, वाहन चालक, कर्मचारी, कुशल तंत्रज्ञ यांचीही आवश्यक आहे.

## रोह्यात आज स्वच्छता रॅली

**रोहे : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियानाच्या अनुषंगाने रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने शनिवारी (दि. १७) सकाळी ९.३० वाजता रोहा-कोलाड मार्गावर स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वच्छ भारत अभियानच्या अनुषंगाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर हा पंधरवडा 'स्वच्छ अमृत महोत्सव' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या पंधरवड्यात रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शनिवारी सकाळी ९.३० वाजता स्वच्छता रॅली काढण्यात येणार आहे.

या रॅलीत सहभाग घेण्याकरिता नागरिकांनी https://innovateindia.mygov. in/swachhyouthrally/ या लिंकवर अथवा नगर परिषदेने दिलेल्या बारकोड स्कॅन करून नाव नोंदणी करावी. सर्व नागरिकांनी या 'स्वच्छ अमृत महोत्सव'मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन नगर परिषदेचे प्रशासक धीरज चव्हाण यांनी केले आहे.


# कुशल नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी

विद्यापीठाचे विद्यार्थी असताना पंतप्रधान मोदी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत नियमितपणे जाऊ लागले. अशा प्रकारे संघाचे निष्ठावान प्रचारक म्हणून त्यांच्या जीवनाची सुरुवात झाली. त्यांनी सुरुवातीपासूनच राजकीय सक्रियता दाखवली आणि भारतीय जनता पक्षाचा पाया मजबूत करण्यात मोठी भूमिका बजावली. ते एक लोकप्रिय वक्ता आहेत, ज्यांच्यासाठी आजही मोठ्या संख्येने श्रोते पोहचतात. २० मे २०१४ रोजी संसद भवनात आयोजित केलेल्या भाजप संसदीय पक्ष आणि मित्रपक्षांच्या संयुक्त बैठकीत लोक प्रवेश करीत होते, तेव्हा नरेंद्र मोदींनी संसद भवनात प्रवेश करण्यापूर्वी त्याचप्रकारे जमिनीवर लोटांगण घातले ज्याप्रकारे एखाद्या पवित्र मंदिरात प्रवेश करताना नमस्कार केला जातो. संसद भवनाच्या इतिहासात त्यांनी असे करून सर्व खासदारांसमोर आदर्श ठेवला आहे. ते आईबद्दल विशेष प्रेम आणि आदर यासाठीहीदेखील ओळखले जातात. त्यांच्या स्वच्छता अभियानाला देशभरात पसंती मिळाली. त्यांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात असून संपूर्ण जगामध्ये त्यांची प्रतिमा कुशल नेत्याची आहे.

नरेंद्र दामोदरदास मोदी भारतीय राजकारणातील तो चेहरा आहे, ज्यांनी अवघ्या काही वर्षांमध्ये देशातील राजकारणाची अवघी परिभाषाच बदलून टाकली. त्यांच्या राजकीय रणनितीपुढे सारा विपक्ष धारातीर्थी पडला. शिवाय जगापुढे ग्लोबल लीडर म्हणून स्वतःची प्रतिमा निर्माण करण्यात देखील ते यशस्वी झाले. यामुळेच आज जनता मोदींकडे एका नायकाच्या रूपाने पहात आहे. केवळ मोदीच असे राजकीय नेता आहेत ज्यांना विदेशातदेखील मोठ्या प्रमाणात सन्मान दिला जातो. वैश्विक स्तरावर नरेंद्र मोदींनी संबंध उत्तमरितीने जोपासले आहेत आणि मैत्रीदेखील सांभाळलीये. त्यामुळे संपूर्ण जग त्यांची प्रशंसा करताना थकत नाही. आज जरी मोदीजींनी आकाशाला गवसणी घातलीये तरीसुद्धा त्यांचे पाय कायम जमिनीवर स्थिरावलेले आहेत. समाजातील निम्न स्तरात राहणाऱ्या गरीब कुटुंबीयांच्या आयुष्यात आनंद आणण्याकरीता ते सतत प्रयत्नशील असतात.

२०१४साली झालेल्या निवडणुकीत आपल्या कौशल्यपूर्ण रणनितीने पक्षाला ऐतिहासिक विजय मिळवून दिल्यानंतर नरेंद्र मोदींनी २६ मे २०१४ला भारताचे १५वे पंतप्रधान म्हणून गोपनियतेची शपथ घेतली. प्रधानमंत्री पदाची जबाबदारी नरेंद्र मोदींनी उत्कृष्टपणे सांभाळली. या दरम्यान केवळ त्यांनी देशाच्या आर्थिक स्थितीला बळकटी दिली असे नव्हे तर देशातून गरिबी, बेरोजगारी, भ्रष्टाचार दूर करण्याकरीता विशेष प्रयत्न केले. मोदींनी महिला, मुलं, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, शेतकरी, युवा या सर्व वर्गांच्या हीताला समोर ठेऊन अनेक योजनांची सुरुवात केली. भारतात स्वच्छता अभियानाची सुरुवात करून लोकांमध्ये स्वच्छते प्रती जागरूकता निर्माण केली.


पीएम पदाची जवाबदारी सांभाळल्या नंतर नरेंद्र मोदींनी एका मागोमाग एक विदेश दौरे करत भारताचे संबंध इतर देशांशी मजबूत करण्याचे प्रयत्न केले. सोबतच विदेशी व्यवसायांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहित केलं. शिक्षण, स्वास्थ्य, सुरक्षा, परिवहन, रस्ते, मनोरंजन, यांसारख्या क्षेत्रात मोदींनी अनेक कामं केलीत. या व्यतिरिक्त मेक इन इंडिया आणि डिजीटल इंडिया सारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांना जागरूक केले.

आपल्या सकारात्मक विचारांनी आणि विकसनशील कार्याने त्यांनी जनतेच्या मनात आवडता प्रधानमंत्री म्हणून आपली छाप सोडली आणि याचा परिणाम त्यांना २०१९च्या निवडणुकांमध्ये मिळाला. एक सक्षम आणि सशक्त प्रधानमंत्री म्हणून आपली छाप सोडणाऱ्या नरेंद्र मोदींनी २०१९मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा एकदा पंतप्रधानपदाची निवडणूक लढली आणि या वेळी त्यांची जादू कमाल करून गेली. ५४२ जागांपैकी ३५३ जागांवर विजयश्री मिळवून त्यांनी ७० वर्षे जुन्या कॉंग्रेस पार्टीला धारातीर्थी पाडले आणि आपल्या रणनीतीने २०१९च्या निवडणुकीत इतिहास रचला. अशा तऱ्हेने भारताला नरेंद्र मोदींच्या रुपात प्रधानमंत्री नव्हे तर प्रधानसेवक मिळाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी पुन्हा एकदा जनतेचा विश्वास संपादन करून दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी ते विराजमान झाले. ते सतत देशातील जनतेच्या विकासाकरीता कार्यरत आहेत.

आपल्या दमदार विदेशनितीला धरून मोदींनी धडाकेबाज विदेश दौरे करून विश्वस्तरावर भारताची एक वेगळी ओळख निर्माण केलीये. त्यामुळे आज आपला भारत विश्वसमूहा समवेत पाऊलावर पाऊल ठेवत वाटचाल करतोय. हा परिणाम पूर्णतः मोदींच्या रणनीतीचा आणि कुटनीतीचाच म्हणावा लागेल. ज्या देशांच्या नजरेत एकेकाळी आपला भारत सलायचा, आज तेच देश भारताशी मैत्री करण्याकरीता धडपडतायेत. नरेंद्र मोदींनी ब्रिक्स, सार्क, संयुक्त राष्ट्र आणि जी-२० शिखर सम्मेलनात भाग घेऊन त्याठिकाणी आपल्या भारताला मजबूत राष्ट्राच्या रुपात सर्वांसमोर ठेवले. त्यामुळे मोदींच्या विचारांचे, दूरदृष्टीचे, फार कौतुक झाले.

दुसरीकडे मोदींच्या जापान यात्रे नंतर भारत-जापान संबंधांना एक नवा आयाम मिळाला. याशिवाय नरेंद्र मोदी मंगोलियाची यात्रा करणारे देशाचे पहिले प्रधानमंत्री आहेत. सोबतच पंतप्रधान मोदींच्या चीन आणि दक्षिण कोरियाच्या यात्रासुद्धा भारतात गुंतवणूक आणण्याच्या दृष्टीने फार यशस्वी ठरल्या.

प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, सुकन्या समृद्धी योजना, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, प्रधानमंत्री कृषी विमा, प्रधानमंत्री कौशल विकास योजना, मेक इन इंडिया, गरीब कल्याण योजना, स्टार्ट अप इंडिया, प्रधानमंत्री मुद्रा बँक योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सांसद ग्राम योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना, अटल पेंशन योजना, उडान योजना, स्किल इंडिया (कौशल भारत योजना), स्वच्छ भारत योजना, बेटी बचाओ-बेटी पढाओ योजना, स्मार्ट सिटी योजना, या शिवाय देखील पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अन्य बऱ्याच योजनांची सुरुवात केली ज्याचा लाभ देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचत आहे.



**देशाचे सर्वाधिक लोकप्रिय नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा! ईश्वराकडे तुमच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दीर्घ आयुष्याची कामना करतो. मोदींच्या रूपात देशाला सशक्त आणि निर्णायक नेतृत्व मिळालेय. काही दशकांपासून आपल्या हक्कांपासून वंचित असलेल्या कोट्यवधी गरिबांना विकासाच्या मुख्य प्रवाहात जोडून केवळ त्यांना समाजात सन्माननीय स्थान दिले नाही, तर एका प्रजावत्सल नेतृत्वाचे उदाहरणच त्यांनी जगासमोर मांडले आहे.**

**खरंच भारतीय राजकारणात मोदी आपल्या कुशल नेतृत्वाने जगभरात हिरो नं. १ ठरले आहेत. त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!**

**-श्री. अरुणशेठ भगत**
अध्यक्ष, पनवेल तालुका भाजप मंडल

भारताच्या राजकीय पटलावर
प्रस्थापित पक्षांचा पगडा होता,
पण लोकांच्या न्यायासाठी
संघर्ष आमचा तगडा होता

स्वातंत्र्याची पन्नास वर्षे
एकाच कारभाऱ्याचं वर्चस्व होतं,
गावोगावी पुतळे उभारणं
हेच त्यांचं सर्वस्व होतं

नरेंद्र मोदींसारखा मसिहा
मदतीला आपल्या धावून आला,
देशाची पताका पुन्हा
जगात साऱ्या घेऊन गेला

लाचारीला दिला न थारा
कोरोनाच्या कार्यातही सत्वर,
गुलामांनी पोसलेल्या दहशतीला
लष्कराद्वारे दिले चोख उत्तर

जगात आज मान आपली
आपल्या कार्यातून उंचावली आहे,
धोरणांची व्याप्ती पाहून
किर्ती आपली विस्तारली आहे

भारतमातेची सेवा करणे
हाच त्यांचा वसा आहे,
जनतेला सोबत घेऊन पुढे
जाणे हाच बुलंद नारा आहे.

**-सौ. विद्या प्रकाश तामखडे**
अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष
भटके विमुक्त महिला आघाडी
उत्तर रायगड जिल्हा



## रोहा नगर परिषद

**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.**
फोन नं. कार्यालय-०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४-२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/विद्युत/नि.सु./हायमास्ट दुरुस्ती/०९२१/२०२२-२३, दिनांक :- १६/०९/२०२२

### जाहिर निविदा सूचना

रोहा नगर परिषद, रोहा यांजकडून खालील नमुद केलेल्या कामासाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकड़न निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | इसारा रक्कम (रूपये) | कोरी निविदा फॉर्म फी | काम पुर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रोहा नगर परिषद हद्दीतील हायमास्ट दिवा आवश्यक त्या साहित्यासह दुरूस्ती करणे व कार्यान्वित करून देणे.(एक दिवा.) | २००० | १०० | ३० दिवस |

**निविदा अटी/शर्ती :-**

१) विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय,रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १९-०९-२०२२पासून २८-०९-२०२२ रोजीपर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी टेंडर फॉर्म फी वर नमुद केले प्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करून निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.
२) निविदा पत्रे दिनांक २८-०९-२०२२ रोजी पर्यंत सांय.५.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावेत.
३) विषयांकीत कामाचे देयक ठेकेदारास नगर परिषदेकडे जसा निधी उपलब्ध असेल त्या प्रमाणात अदा करणेत येईल.
४) निविदेसंदर्भात काही अडचणी असल्यास नगर परिषद कार्यालयात कार्यालयिन वेळेत विद्युत विभागात संपर्क साधावा.

**सही/-**
**(डॉ.धीरज चव्हाण)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works under EHV Testing. Dn., Panvel

| Sr. No. | Tender No. | Description | Estimated Amount in Rs. | EMD in Rs. | Tender fee in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 2 | EE/PAC/DN./ PNL/TECH/ Ten - 8/2022-23 RFX no. 7000024576 | Extension of E- tender for providing services of 4nos. (semi-skilled labour) as assistant technician (general) and 1no. of (skilled labour) as senior technician (trans system) required at PAC Dn., Panvel. | 7,10,979.71 | 7109.8 | 500/- + GST |

**Submission of bids from 15.09.2022 to 22.09.2022 up to 23.59 hrs, Bid opening date and time:- 23.09.2022 at 10:00 hrs (Technical) and at 11:00hrs (Commercial) if possible.**
**For further details visit our Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in**
**Contact person: The Executive Engineer - 8788074706**
**The Dy. Executive Engineer (O) - 9619499485**
**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer**
**PAC Dn., Panvel**

# इतिहास घडविणारा राष्ट्रनेता

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज ७२वा वाढदिवस देशभर साजरा होत आहे. संपूर्ण जगाला आपल्या नेतृत्वाची दखल घ्यायला लावणारे आणि लोकप्रिय नेते म्हणून संपूर्ण जगात अव्वल ठरलेल्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा आम्हाला अभिमान वाटत असून खऱ्या अर्थाने ते आज 'राष्ट्रनेता' आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करणारा शुभेच्छापर विशेष लेख...

जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाहीत, असे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर विश्वास आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदी हे नेहमी देशाला संबोधित करताना इतिहासाची उजळणी करतात. नव्या पिढीला आपल्या देशाच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून देत असतात. महापुरुषांच्या कार्याचा आदर्श नव्या पिढीने घ्यावा यासाठी ते आवाहन करतात. आता नुकतेच त्यांनी आपल्या देशाच्या नाविक दलाच्या नव्या ध्वजाचे लोकार्पण केले. नवीन ध्वजात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेची छटा वापरण्यात आली आहे. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, भारतीय नाविक दलाचे, आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज आहेत. त्यांचा आदर्श घेण्यासाठी आणि त्यांनी घडविलेल्या पराक्रमाच्या इतिहासातून प्रेरणा घेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांना हा नवा ध्वज समर्पित केला आहे.

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचा दृढ विश्वास आहे. मुंबईत चैत्यभूमीलगतच्या इंदू मिलची जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी मिळवून देण्यात पंतप्रधान मोदींनी तत्परता दाखविली. लंडनमधील हेन्री रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. दिल्लीतील २६ अलिपूर रोड ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निर्वाणभूमी आहे. तिथे संविधानाच्या आकारात डॉ. आंबेडकरांचे सुंदर भव्य स्मारक पंतप्रधान मोदींनी उभारले आहे. दिल्लीतील १५ जनपथ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर उभारण्यात आले आहे. भीमजन्मभूमी महू मध्यप्रदेश, रत्नागिरी आंबडवे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, इंदू मिल येथे उभारण्यात येणारे स्मारक व तेथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उंच स्टॅच्यू ऑफ ईक्वालिटीचा पुतळा ही पंचतीर्थे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कल्पक नेतृत्वाच्या संकल्पनेतून साकारली आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकशाही मुल्यांची पूजा करणारे, संविधानाला मानणारे लोकनेते, राष्ट्रनेते आहेत. त्यांनी २०१९च्या लोकसभा निवडणुकीत बहुमताने विजय मिळविल्यानंतर सर्व खासदारांसमोर संसदेत सर्वप्रथम संविधानाला नतमस्तक होत अभिवादन केले होते.



विरोधकांनी कितीही आरोप केले तरी आपल्या कृतीतून त्यांना उत्तर देत आपल्या कर्तृत्व सिद्ध करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भारतात आणि विश्वात सर्वाधिक लोकप्रिय आहेत. नवीन संसद भवनाच्या निर्मितीचे काम वेगाने होत असून त्यात उभारलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नुकतेच लोकार्पण केले आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे विचार देशाने स्वीकारले असते, तर आपला देश आणखी पुढे असता याची खंत व्यक्त करून पंतप्रधान मोदींनी देशाला नेताजींच्या इतिहासाची आठवण मनात ठेऊन त्यांच्या विचारांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले आहे.

फाळणीच्या काळात तत्कालीन गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा इतिहास देशासमोर उभा करताना सरदार वल्लभभाई पटेल यांचा जगातील सर्वाधिक उंचीचा पुतळा गुजरातमध्ये नर्मदा नदीजवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उभारला आहे. ऐतिहासिक महापुरुषांचा वारसा पंतप्रधान मोदी देशाला देत असताना स्वतः एक नवा इतिहास घडवित आहेत.

२०१४पासून ते देशाचे पंतप्रधान झाले असून जनतेने त्यांच्यावर अतूट प्रेम केले आहे. देशभर लोकप्रियता सतत कायम असताना जगात ही त्यांची अव्वल जागतिक नेते म्हणून लोकप्रियता आहे. २०१४पासून भारतात मोदी युग सुरू झाले असून सर्वांना सोबत घेऊन सर्वांचा विकास करणारे आणि सर्वांचा विश्वास जिंकणारे हे मोदी युग आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना मी ते गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हापासून ओळखत आहे. गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांच्या निवासस्थानी तथागत भगवान बुद्धांची सुंदर मूर्ती आहे. भारत-नेपाळ संबंध दृढ करताना पंतप्रधानांनी बुद्ध जन्मभूमी लुम्बिनीलाही भेट दिली आहे. जगभर भारत एक विकसित राष्ट्र म्हणून आपला एक दबदबा निर्माण करीत आहे. पंतप्रधान मोदींच्या दूरदृष्टीतून आपले पराष्ट्रधोरण यशस्वी होताना दिसत आहे.

जगभर होत असलेल्या ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये आता भारताचे क्रीडापटू सुवर्ण, रजत, कांस्य पदके जिंकत आहेत. महाराष्ट्रातील मोलमजुरी करणाऱ्या वीटभट्टी कामगाराचा मुलगा अविनाश साबळे हा अडथळ्यांच्या स्टीपल चेस शर्यतीत कॉमन वेल्थ गेम्समध्ये सिल्व्हर मेडल जिंकू शकला. क्रीडापटूंकडे विशेष लक्ष देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या धोरणाचे हे फलित आहे. जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० हटवून नवा इतिहास घडवून देशातील अन्य राज्यांशी जम्मू -काश्मीरची नाळ जोडली तसेच मुस्लिम महिलांना न्याय देणारा तीन तलाकचा कायदा रद्द करून नवा इतिहास मोदींनी घडविला आहे. देशातील अपंगांना 'दिव्यांग' शब्द देऊन त्यांच्याबद्दल विविध योजना राबवून त्यांना सक्षम करणारे, ज्येष्ठ नागरिकांसाठी योजना राबविणारे, सामाजिक न्याय मंत्रालयाचा बजेट १३ हजार १३४ कोटी इतका असून सामाजिक न्यायाची जाण असणारे राष्ट्रनेते नरेंद्र मोदी आहेत.

पंतप्रधान आवास योजनेद्वारे बेघरांना घर, ग्रामीण भागातील गृहिणींची चुलीच्या धुराच्या त्रासातून सुटका करण्यासाठी मोफत सिलेंडर देणारी उज्वला योजना देशात लोकप्रिय झाली. सबका साथ सबका विकास आणि सबका विश्वास या त्रिसूत्रीतून पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या विकासासाठी अहोरात्र काम करीत आहेत. शेवटच्या माणसाला न्याय मिळावा हे अंत्योदयाचे उद्दिष्ठ्य घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी काम करीत आहेत. कोरोनाच्या महमारीत सूत्रबद्ध पद्धतीने त्यांनी लसीकरणासह आरोग्य यंत्रणेचे नियोजन केले होते. इतिहास घडविणारे राष्ट्रनेता लोकनेता विश्व नेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या ७२व्या वाढदिववानिमित हार्दिक शुभेच्छा त्यांना दीर्घ आयुरारोग्य लाभो. त्यांच्या नेतृत्वात भारत जागतिक महासत्ता होवो हिच शुभेच्छा!

**-ना. रामदास आठवले, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा राष्ट्रीय अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)**

# तरुणाईचा आवडता नेता

२०१४साली देशाची तरुण पिढी सोशल मीडियाच्या नादी लागून वाया जात आहे, असा एक प्रोपोगंडा देशभर निर्माण झाला होता, मात्र विषालाही अमृत बनवण्याचे सामर्थ्य भारतात आहे याचा प्रत्यक्ष प्रत्यय पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जगाला दिला. सोशल मीडियाच्या माध्यमातून देशाशी संवाद साधून आपल्या अमोघ वाणीतून आणि कर्तृत्वाच्या जोरावर मोदींनी देशातील तरुणांची मने जिंकली आणि सोशल मिडियावर देशभक्तीची लाट उमटू लागली. आपल्या भारताचा गौरवशाली इतिहास विसरून जगाला फॉलो करणारी तरुण पिढी देशभक्तीकडे आकर्षित होऊ लागली. जेव्हा तरुण संघटित होतो तेव्हा देशात परिवर्तन झाल्याशिवाय राहत नाही.



तरुणांना शालेय शिक्षणासोबत कौशल्य शिक्षण दिल पाहिजे, या मोदींच्या विचाराने देशात प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना आली आणि अनेक तरुणांचे भाग्य बदलले. तुटपुंज्या पगारात पोटाची खळगी भरणारा तरुण रोजगार शोधण्यासाठी नाही तर रोजगार देण्याच्या दिशेने निघाला. त्याचाच परिणाम म्हणून आपण जागच्या अर्थव्यवस्थेत १०व्या स्थानावरून थेट पाचव्या स्थानावर पोहचलो. भारत हा तरुणांचा देश आहे. या तरुणाईच्या सहकार्यानेच तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभे केले होते. स्वातंत्र्य युद्धात अनेक तरुणांनी आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेऊन या भारतमातेच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांनी प्रेरित होऊन याच तरुणांनी देशात क्रांती घडवून आणली होती आणि आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विचारांनी प्रेरणा घेत आजचा तरुण भारताच्या निर्माणात आपले मोलाचे योगदान देत आहे.

समाजातील शेवटच्या व्यक्तीचा विकास म्हणजेच अंत्योदयचे स्वप्न घेऊन स्थापन झालेला भारतीय जनता पक्ष खरेच आज आपल्या स्वप्नांच्या पूर्ततेकडे वाटचाल करीत आहे. 'सत्ता हे साध्य नाही तर साधन आहे जनतेचा विकास करण्याचे' हे ब्रीदवाक्य केवळ भाषणात न सांगता प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी प्रत्यक्ष कृतीमधून दाखवून दिले आहे. घरात संपूर्ण कुटुंबातील सदस्यांच्या पोटाची भूक मिटवण्यासाठी घरातील माता स्वयंपाकघरात आपले आयुष्य खर्ची घालत असते. अशा मातेला चुलीच्या धुराचा त्रास होऊन फुफ्फुसांचा कर्करोग होऊ शकतो, याचा विचार करीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून प्रत्येक मातेपर्यंत गॅस उपलब्ध करून दिला आहे. नोकरी करणाऱ्या महिला आपल्या गर्भधारणेच्या काळातसुद्धा पैशांच्या गरजेपोटी नोकरी करीत असतात, मात्र त्यामुळे त्यांच्या आणि त्यांच्या बाळाच्या आयोग्यवर गंभीर परिणाम होत आहे. याचा विचार करीत गरोदर महिलांना सशुल्क सुट्टी जाहीर करून अनेक मातांचे आणि बाळांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याचे काम मोदीजींनी केले आहे.

अनेक गरीब आजरी असूनही आपल्या हलाखीच्या परिस्थितीमुळे दवाखान्यात उपचार घेऊ शकत नाहीत. याचा विचार करीत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाला पाच लाख रुपयांचा सुरक्षाविमा उपलब्ध करून अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचत आहेत. देशाच्या सीमेच्या संरक्षणासाठी आपल्या जीवाची पर्वा न करता काम करणाऱ्या आपल्या सैनिक बांधवांसाठी आधुनिक शस्त्र उपलब्ध करून देण्यात मोदींनी जागतिक विक्रम केला आहे.

३६ राफेल खरेदी करून देशाच्या हवाई दलाच्या जवानांना आधुनिक तंत्रज्ञान वापरून देशाची सुरक्षा करण्याची सोय उपलब्ध झाली आहे. संपूर्ण भारतीय बनावटीची युद्धनौका असलेल्या विक्रांतचे जलावतरण करून जगाला भारताच्या कौशल्याचे प्रदर्शन मोदीजींनी घडवले आहे. सैनिकांसाठी सेनेला वन रँक वन पेन्शन ही योजना आणून निवृत्तीनंतरचे त्यांचे जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न पंतप्रधान मोदी करीत आहेत.

भारत कधीही कोणाचे वाईट चिंतत नाही किंवा कधीही कोणालाही त्रास देत नाही, पण जर भारताच्या वाट्याला जाणार असाल तर मात्र भारत कोणाला सोडतही नाही याचा स्पष्ट संदेश जगाला सर्जिकल स्ट्राईक करून दिला. वारंवार भारतीय जवानांना त्रास देणाऱ्या पाकिस्तानला सडेतोड उत्तर देत जगाला भारताच्या सामर्थ्याची ओळख करून दिली.

अशा अनेक आघाड्यांवर भारताला जगात सर्वोच्च स्थानावर घेऊन जाण्यासाठी प्रधानसेवक नरेंद्र मोदी अथक परिश्रम करीत आहेत. 'जय जवान जय किसान जय विज्ञान' यानंतर 'जय अनुसंधान' असा नारा देत भारत मातेच्या विकासाठी प्रत्येक भारतीयाला प्रोत्साहित करीत आहेत.

अशा या भारत मातेच्या वीर सुपुत्राला मनापासून वंदन! ईश्वर आपल्याला भारतमातेची सेवा करण्यासाठी उदंड आणि निरोगी आयुष्य प्रदान करो अशी ईश्वरचरणी प्रार्थना...!

**-प्रज्ञेश खेडकर, सरचिटणीस, भारतीय जनता युवा मोर्चा नेरळ**

# कणखर नेतृत्व

१७ सप्टेंबर हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस. मोदीजी एक असे व्यक्तिमत्त्व आहे की, जे सामन्यातील सामान्य व असामान्यातील असामान्य वाटते. देशहितासाठी समाजकारण, राजकारण, अर्थकारण व विकासकारण याचे नाव म्हणजे नरेंद्र मोदी.

पंतप्रधान होण्याआधी नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्या वेळी केंद्रात काँग्रेसची सत्ता होती. तरीही त्यांनी गुजरातचा विकास करून दाखविला. जनसामान्यांचे प्रश्न सोडविले. जनमानसात स्वतःचे स्थान निर्माण केले. देशात गुजरातला एक नंबरवर नेऊन ठेवले. राज्याचे हित साधतानाच देशहितालाही प्राधान्य दिले. केंद्रात काँग्रेसचे म्हणजेच विरोधी पक्षाचे सरकार असल्याने मोदींना अनेक प्रसंगी बोचरी टीका व प्रचंड विरोध सहन करावा लागला, पण गुजरातचा विकास काही थांबला नाही.

२०१९च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपचे तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून नरेंद्र मोदी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. त्यांच्याच नेतृत्वाखाली ही निवडणूक लढविली गेली. प्रचारादरम्यान सारा देश मोदींनी पिंजून काढला. त्यांनी मतदारांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या सभांना लाखोंचा समुदाय जमू लागला. जनतेच्या मनात मोदींनी स्वतःबद्दल व पक्षाबद्दल विश्वास निर्माण केला. सबका साथ सबका विकास ही त्यांची घोषणा प्रभावी ठरली. परिणामी निवडणुकीत बहुतेक सर्वच विरोधी पक्ष भुईसपाट झाले. भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले. यात मोदींचा सिंहाचा वाटा होता.

३० वर्षांनी एकाच पक्षाचे बहुमतातील भाजपचे सरकार स्थापन झाले. या बदलाचे किमयागार व पंतप्रधानपदाचे हकदार अर्थातच नरेंद्र मोदीच ठरले. ते प्रथमच पंतप्रधान झाले. त्यांच्या नेतृत्वात निष्ठावान, सक्षम व कार्यक्षम मंत्रिमंडळ स्थापन झाले. देशाचा विकास वेग वाढला, विकासगंगेचे पात्र रूंदावत गेले. 'ना खाऊंगा ना खाने दुंगा' या त्यांच्या विधानाची जरब शासन-प्रशासनावर कायम राहिली. सर्वच क्षेत्रांत कामाची आखणी, बांधणी व पूर्तता वेळेत होऊ लागली. लालफित आणि लाल दिवा दोन्ही गायब झाले. मंत्री सेवक झाले व पंतप्रधान प्रधानसेवक झाले. हे परिवर्तन देश प्रथमच पाहत होता.

देशात सर्वच क्षेत्रांत कामाचा वेग वाढला, दर्जा सुधारला. सब का साथ सबका विकास हा मूलमंत्र यशस्वी ठरला. लोकांचाही पंतप्रधान मोदींवरील विश्वास दृढ झाला. देशासाठी सर्वस्व अर्पण करणारा महान नेता मोदींच्या रूपाने जनतेने पुन्हा एकदा पाहिला. जनताजनार्दन हाच माझा परिवार आणि वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेनुसार त्यांचे क्रांतिकारी निर्णय जनतेने पाहिले. गरीबातला गरीब केंद्रस्थानी मानून केंद्र सरकारचा राज्यकारभार सुरू झाला. देशाच्या शिक्षणाला आणि सुरक्षेला प्राधान्य दिल्याने दहशतवादी कारवाया कमी झाल्या. एकेकाळी ४०० खासदारांच्या घरात असणारी काँग्रेस ४०च्या घरात आली, तर दोन खासदारांनी सुरू झालेला भाजप ३००च्या घरात पोहचला. मोदींच्या प्रचारशैलीचे व कार्यशैलीचे हे फलस्वरुप आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत सर्व विरोधक हातात हात घेऊन एकत्र येऊन भाजपच्या विरोधात लढले आणि एकमेकांच्या पायात पाय अडकून पडले.

पंतप्रधान मोदींची राजकीय रणनिती, पाकिस्तान व चीनच्या घातपाती कारवायांना दिलेले चोख उत्तर, दहशतवादाचे उच्चाटन-सर्जिकल स्ट्राईक व एअर स्ट्राईकने पाकिस्तानचे कंबरडेच मोडले. चीनची दादागिरी मोडून काढली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जम्मू काश्मीरसाठी लागू करण्यात आलेली ३७० व ३५ ही दोन्ही कलमे मोदींनी हटविली. त्यामुळे काश्मीर देशाच्या मुख्य प्रवाहात येऊन भ्रष्टाचारमुक्त झाले. विकास प्रक्रियेला वेग आला. त्यामुळे देशविरोधी कारवाया व दहशतवादाला आळा बसला. या सर्व निर्णयांमुळे जनतेचा मोदींवरील विश्वास दृढ झाला. त्यांच्या रूपाने देशाने कणखर नेतृत्व पाहिले, अनुभवले. याचा परिणाम म्हणजे २०१९च्या लोकसभा निवडणुकीत विरोधकांचे पानिपत होऊन भाजपला स्पष्ट बहुमत मिळून मोदी सलग दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले. जनतेने दिलेली ही त्यांच्या देशकार्याची पावतीच आहे.

गेली सलग सात वर्षे मोदी एक यशस्वी पंतप्रधान म्हणून कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरही देशाची आन, बान, शान वाढली आहे. मान-सन्मानही वाढला आहे. सलग दोनदा ते विश्वनेता ठरले आहेत. जगाच्या राजकारणात भारताचा विचार सन्मानपूर्वक होऊ लागला आहे. त्यांनी कोरोना महामारीवर अत्यंत संयमाने, धीराने व साहसाने निर्णय घेतले, उपाय योजले व कोरोनावर बहुतांशी मात करण्यात यशस्वी ठरले.

कोरोना महामारीच्या पहिल्या लाटेत भयभीत झालेल्या जनतेला पंतप्रधान मोदींनी मानसिक धैर्य देऊन मनोबल वाढविण्यासाठी केलेल्या सूचनांचे आणि आवाहनांचे जनतेने श्रद्धेने पालन केले. त्याचवेळी विरोधकांनी टिंगलटवाळीचे संचालन केले, पण मोदींनी त्याकडे दुर्लक्ष करून ज्ञान-विज्ञानाच्या मदतीने केवळ भारतीयांसाठीच नव्हे, तर इतर देशांसाठीदेखील लस निर्मितीवर लक्ष केंद्रित केले. त्यात यशस्वी होऊन देशातील ७० टक्के जनतेचे लसीकरण पूर्ण झाले. टिकाकारांच्या टीकेकडे लक्ष न देता आपल्या लक्ष्यावर लक्ष केंद्रित करून कार्यरत राहण्याच्या या गुणामुळेच त्यांना लक्षवेधी यश लाभते हे निश्चित. मेक इन इंडिया अर्थात आत्मनिर्भर भारत या योजनेलाही प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.



कोरोना काळात गोरगरीब, मजूर यांना मोफत अन्नधान्य व इतर गोष्टींचा सातत्याने पुरवठा करून देशात कोणाचाही भूकबळी जाणार नाही याची खबरदारी व जबाबदारी पंतप्रधान मोदींनी घेतलीत व त्यात अत्यंत कुशलतेने सफलता मिळवली. हेतू शुद्ध असेल तर यश प्राप्त होते हेच यातून दिसून येते.

गरीबांसाठी राबविलेल्या विविध योजनांमुळे गोरगरीबांचा कैवारी या उपाधीला न्याय देणारा पंतप्रधान अशीच मोदींची ख्याती झाली. त्यांनी कोरोनाच्या अत्यंत गंभीर, नाजूक व भीषण परिस्थितीत जनतेला दिलासा दिला, त्यांचे मनोधैर्य व आत्मबल वाढविले. याही कठीण काळात देशाच्या विकासाचा आलेख खाली येऊ दिला नाही. उलट तो उंचावत राहिला.

सीमांवरचा ताणतणाव कमी करून देशाचा तिरंगाही डौलाने फडकत राहिला, राहतो आहे व भविष्यातही राहिल ही ग्वाही साऱ्या जगाला देणारा सामर्थ्यशाली पंतप्रधान ही मोदींची ख्याती म्हणावी लागेल. पंतप्रधान मोदींच्या या संपूर्ण राजकीय प्रवासाकडे पाहताना भारतीयच नव्हे, तर परदेशी राजकीय दिग्गजही अचंबित होतात. या कार्यप्रणालीचे सर्वत्र कौतुकच होताना दिसते. प्रत्येक सभेपूर्वी मोदी... मोदी हा जयघोष दशदिशा व्यापून उरतो आणि अवघे सभास्थळ मोदीमय होऊन जाते. ही त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष ठरते.

शेकडो वर्षांपासून अयोध्येतील राम मंदिराचा प्रश्न रखडला होता. तो मार्गी लावण्यासाठी योग्य ती कायदेशीर लढाई पंतप्रधान मोदींनी जिंकली तसेच कोरोना काळातही सर्व नियम पाळून राम मंदिर भूमिपूजन सोहळा त्यांच्या हस्ते दिमाखात झाला. हीदेखील एक ऐतिहासिक नोंद आहे. सर्व विरोधक एकत्र येऊन मोदींविरोधात निवडणूक लढविणे पसंत करतात. याचाच अर्थ त्यांची जनमानसातील प्रतिमा किती अढळ व अटळ आहे हे त्यांनाही मान्य आहे.

विरोधाला आणि आंदोलनाला घाबरणारा नेता मोदी नाही हे ते आपल्या कार्यप्रणालीतून सिद्ध करीत आलेले आहेत. जनहिताबरोबरच राष्ट्रहित जपणारा, मानवतावादी दृष्टिकोन जोपासणारा नेता म्हणजे मोदी. म्हणूनच त्यांची 'मन की बात' ही 'जन की बात' ठरते.

मोदींच्या लोकप्रियतेला विरोधक एकत्र येऊन सुरूंग लावण्याचे प्रयत्न करीत आहेत, पण त्यात त्यांना यश येईल असे वाटत नाही, कारण मोदींच्या शब्दकोशात अपयश हा शब्दच नाही. आज पंतप्रधान मोदींचा वाढदिवस संपूर्ण देशभर व देशाबाहेरही भारतीय साजरा करीत आहेत. या हिंदी कवितेतून मी वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देतो...

**मोदीजी.. दीर्घायु रहे आप..।**
**मोदीजी नेता नही महानेता है आप**
**पंतप्रधान होकर भी प्रधानसेवक है आप**
**दिनरात देशवासीयोंकाही**
**विचार करते है आप**
**निष्ठा, नियोजन और नवनिर्माण**
**का नाम है आप**
**भारतीयोंकी आंस और सांस है आप**
**देश का वर्तमान और भविष्य है आप**
**सौगंध इस मिट्टी की देश नही**
**मिटने देंगे आप**
**उक्ती और कृती का मिलन है आप**
**देशभक्ती और राष्ट्रोन्नती**
**का परिमाण है आप**
**हम सबकी दुवा ओंका परिणाम है आप**
**बस यही दुवा करते है हम**
**निरामय और दीर्घायु रहे आप...!**

**-रवींद्र घोडके, निवृत्त शिक्षक, खोपोली**

# माणगावमध्ये मुसळधार पाऊस; जनजीवन विस्कळीत

## नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली; काळ, भिरा, गोद नद्यांना पूर



**माणगाव : प्रतिनिधी**

गेले दोन दिवस माणगाव तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत असल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील काळ, भिरा, गोद नद्यांना पूर आला असून त्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. महसूल खात्याकडून नागरिकांना दक्षता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, या पावसामुळे वातावरणात गारवा जाणवत आहे.

माणगाव तालुक्याला १५ व १६ सप्टेंबर रोजी सलग दोन दिवस मुसळधार पावसाने झोडपले. त्यामुळे नद्या, नाल्यांना पूर आला असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. मागील २० दिवस पावसाने विश्रांती घेतल्यामुळे पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव जाणवू लागला होता त्यामुळे शेतकरी धास्तावले होते, पण सलग दोन दिवस पडत असलेल्या पावसामुळे शेतकरी राजा सुखावला आहे.

## पावसाने सप्टेंबर महिन्याची सरासरी १५ दिवसांतच ओलांडली

**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील आठ दिवस रायगड जिल्ह्यात चांगला पाऊस पडत आहे. पावसाने सप्टेंबर महिन्याची सरासरी १५ दिवसातच ओलांडली आहे. सप्टेंबर महिन्याच्या सरासरीच्या १०१.८२ टक्के पाऊस पडला आहे. जिल्ह्याचे वार्षिक पर्ज्यांमान सरासरी तीन हजार २१६ मिलीमीटर आहे. शुक्रवार (दि. १६) पर्यंत तीन हजार ३३ मिलीमीटर पाऊस पडला आहे. म्हणजेच आतापर्यंत वार्षिक पर्जन्यमानाच्या ९४.३२ टक्के पावसाची नोंद झाली आहे. अजून सप्टेंबर महिन्याचे १४ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे यंदा पाऊस वार्षिक सरासरी ओलांडेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

जुन महिन्याचे सरासरी पर्जन्यमान ६४३ मिमी आहे. त्यातुलनेत यंदा ३५७ मिमी पाऊस पडला आहे. जून महिन्यात ५५.५४ टक्के पाऊस पडला. जुलै महिन्याचे वार्षिक पर्जन्यमान एक हजार १५९ मिमी आहे. त्यातुलनेत यंदा सरासरी एक हजार ४६० मिमी पावसाची नोंद झाली आहे. जुलै महिन्यात १२५.९६ टक्के पाऊस पडला. ऑगस्ट महिन्यात सरासरी ८७४ मिमी पाऊस पडतो. पण यंदा सरासरी ८२३ मिमी पाऊस पडला आहे. ऑगस्ट महिन्यात ९४.१३ टक्के पावसाची नोंद झाली. सप्टेंबर महिन्याचे सरासरी पर्जन्यमान ३८६ मिमी आहे. १६ सप्टेंबर सकाळी आठ वाजेपर्यंत ३९३.०२ मिमी पाऊस पडला आहे. सप्टेंबर महिन्याची सरासरी पावसाने १५ दिवसांतच ओलांडली आहे.

सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पाऊस कमी पडला होता. त्यामुळे शतकरी चिंतेत होता. दुसऱ्या आठवड्यात मात्र पावसाचा जोर वाढला. शुक्रवारी (दि. १६) देखील दिवसभर पावसाच्या जोरदार सरी येत होत्या. शुक्रवारी सकाळी ८ वाजता संपलेल्या २४ तासात जिल्ह्यात ५९.१६ मिमी पावसाची नोंद झाली.

सध्या गरव्या जातीची भात पिके वाढीच्या अवस्थेत आहेत तर हळव्या जातीची पिके फुलोरा अवस्थेत आहेत. रायगड जिल्ह्यात पडत असलेला पाऊस भात पिकासाठी पूरक आहे. सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला पावसाने ओढ दिल्याने जिल्ह्यात काही भागात किडरोगांचा प्रादुर्भाव सुरु झाला होता. सध्या पडत असलेल्या पावसामुळे भात पिकावरील कीड रोगाचा प्रादुर्भाव कमी होईल. सप्टेंबर महिन्यात पडलेल्या पावसामुळे जिल्ह्यात कुठेही शेतीचे नुकसान झालेले नाही, अशी माहिती रायगडचे कृषी उपसंचालक डी. एस. काळभोर यांनी दिली.

**जिल्ह्यातील तालुकानिहाय पावसाची टक्केवारी**

**अलिबाग ८८.६७ टक्के, पेण १०३. ७६, मुरूड ८४.८०, पनवेल ९८.७८, उरण १०३.६९, कर्जत ९९.४५, खालापूर ९७.३२, माणगाव ८६.५६, रोहा ९५.९५, सुधागड ८१.४४, तळा ९९.५५, महाड ८५.३२, पोलादपूर ९२.०७, म्हसळा ८५.०३, श्रीवर्धन ९६.६३, माथेरान १०७.५०मिमी.**

## मुरूडमध्ये पावसाचे दमदार पुनरागमन

### किडरोगाचा प्रादुर्भाव होणार कमी



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यात पावसाने पुन्हा जोरदार हजेरी लावल्याने शेतकरी सुखावले आहेत. मुरूड तालुक्यात आतापर्यंत २०६५ मिमी पाऊस पडला असून, शुक्रवारी (दि. १६) सकाळी आठ वाजेपर्यत २४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

मुरूड तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचे कमी प्रमाण झाल्याने सर्वच शेतात खोड किडीचा प्रादुर्भाव वाढला होता. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी चिंतेत होते. त्या बरोबर नागरिकही उष्म्याने हैराण झाले होते. शेतीयुक्त पाऊस पडत नव्हता. परंतु शुक्रवारी सकाळच्या सुमारास पुन्हा जोरदार पावसाने हजेरी लावल्याने भात पिकाला संजीवनी मिळाली आहे. शुक्रवारच्या पावसामुळे मुरुड शहरातील गोल बंगला, मारुती नाका, आझाद चौक या ठिकाणी काही प्रमाणात पाणी साचले होते. त्यामुळे सकाळच्या प्रहरी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ढोपराभर पाण्यातून मार्ग काढावा लागला, मात्र कोणत्याही भागात पडझड झाली नसल्याची माहिती तहसील कार्यालयामार्फत देण्यात आली. जोरदार पाऊस व वाऱ्यामुळे समुद्रात मोठ्या लाटा उसळत होत्या. त्यामुळे मासेमारी करण्यासाठी गेलेल्या होड्या पुन्हा किनाऱ्याला आल्या. दुपारनंतर पावसाचा जोर कमी झाल्यामुळे रस्त्यावरील पाणी ओसरले.



## हेटवणे धरणाचे सहा दरवाजे उघडले



नदी शेजारील गावांना सतर्कतेचा इशारा


**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यात होणाऱ्या मुसळधार पावसामुळे हेटवणे धरण १०० टक्के भरले असून या सहा दरवाजे एका फुटांने उघडले आहे. त्यामुळे नदी व खाडी किनाऱ्यावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी धरण परिसरात भेट देऊन पाहणी केली. पेण शहरातील भुंडापुलावरील वाहतूक बंद करण्यात आली असल्याची माहिती पेण नगर परिषदेच प्रशासक जीवन पाटील यांनी दिली.

नवी मुंबईला पाणीपुरवठा करणारे पेण तालुक्यातील हेटवणे धरण पूर्णतः भरले आहे. या धरणाची एकूण क्षमता १४७ दशलक्ष घनमीटर आहे. मागील काही दिवसांपासून पेण तालुक्यात व धरण क्षेत्र परिसरात मुसळधार पाऊस झाल्याने हेटवणे धरण भरले आहे. त्यामुळे या धरणाचे सहा दरवाजे एक फुटांने उघडले आहे. त्यातून प्रति सेकंद १२० घनमीटर लिटर पाण्याचा विसर्ग होत आहे. या पार्श्वभूमीवर पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार व तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी खाडी व नदी किनाऱ्यावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पावसाचा जोर कमी झाल्याने सध्या तरी पूरपरिस्थिती होण्याची शक्यता नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी केले आहे.



## कर्जत तालुक्यात जोरदार पावसाने लावली हजेरी



**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

गेल्या तीन दिवसांपासून कर्जत तालुक्यात मुसळधार पावसाने कर्जत तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. त्यामुळे नदी, नाले दुथडी भरून वाहत आहेत. मात्र या पावसाने भात शेतीचे नुकसान होणार असल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

कोरोना संकटामुळे दोन वर्षे गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यात आला. यंदा गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा करण्याचे भाविकांनी ठरवले. मात्र गणेशोत्सवाच्या आदल्या दिवशी ३० ऑगष्टला पूर्वा नक्षत्र निघाले आणि पावसाने दररोज हजेरी लावून गणेशोत्सवावर विरजण घातले. प्रत्येक विसर्जनाच्या दिवशी सायंकाळी मुसळधार पाऊस असल्याने गणरायालाही पावसातच निरोप द्यावा लागला. आणि आता पितृ पंधरवड्यात १३ सप्टेंबरला उत्तरा नक्षत्राची सुरुवातच मुसळधार पावसाने झाली आणि आज तिसऱ्या दिवशीही पावसाने कर्जत तालुक्याला झोडपले आहे. या पावसाने फुलोऱ्याला आलेल्या भातशेतीचे नुकसान होणार असून भात उत्पादनावर परिणाम होणार आहे. मध्यंतरी पावसाने उघडीप दिल्याने खोडकिडीचा प्रादुर्भाव झाला होता. त्याचा बचाव होणार आहे.

**दररोज सकाळी नऊ ते बाराच्या दरम्यान पडणाऱ्या पावसामुळे ऐन फुलोऱ्यावर आलेले भातपीक चांगले होणार नाही. या पावसाने भात उत्पादनात प्रचंड नुकसान होणार आहे.**

**–निलिकेश दळवी, प्रगतशील शेतकरी, कर्जत**

## कर्जतमध्ये गाडीवर झाड कोसळले; जीवितहानी टळली



**कर्जत : प्रतिनिधी**

मागील तीन दिवसांपासून कर्जतमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. यामुळे जमिनीत अधिक पाणी मुरल्याने तसेच वादळी वाऱ्याने कर्जत तालुक्यात वृक्ष कोसळण्याच्या घटना घडत आहेत.

शुक्रवारी (दि. १६) दुपारी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास यश रणदिवे हा मुलगा आपल्या वडिलांना कर्जत रेल्वे स्टेशनवर सोडून मुद्रे येथे घरी गवणीच्या मार्गे आपली चारचाकी घेऊन जात होता. त्याच वेळेस रस्त्यालगत असलेला मोठा वृक्ष कोसळत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने तात्काळ जोरात ब्रेक मारून गाडी थांबविली. त्यामुळे संपूर्ण गाडीवर वृक्ष कोसळण्याऐवजी तो गाडीच्या पुढील भागावर म्हणजेच बोनेटवर कोसळला. या दुर्घटनेत गाडीचे नुकसान झाले असले तरी गाडीतील चालक यश रणदिवे सुदैवाने बचावला.

हे झाड रस्त्याच्या मधोमध पडल्याने वाहतूक बंद झाली होती. नगर परिषदेच्या कामगारांनी कटरच्या मदतीने झाडाच्या फांद्या छाटत जेसीबीच्या सहाय्याने झाड हटविले त्यानंतर रस्ता वाहतुकीला खुला झाला.

## भाजपतर्फे अलिबाग तालुक्यात साजरा होणार 'सेवा पंधरवडा'

**अलिबाग : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून (१५ सप्टेंबर) ते महात्मा गांधी जयंती (२ऑक्टोबर) या कालावधीत भारतीय जनता पक्षातर्फे 'सेवा पंधरवडा' साजरा केला जाणार आहे. अलिबाग तालुक्यातदेखील भाजप तर्फे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती भाजप अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे यांनी दिली.

या सेवा पंधरवड्यात पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने भाजप अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, तालुका उपाध्यक्ष सुनिल दामले, तालुका सरचिटणीस अजित भाकरे, शंकर भगत, निखील चव्हाण, जनार्दन भगत, देवेन सोनावणे, ॲड. पल्लवी तुळपुळे, ॲड. रोशनी ठाकूर आणि कार्यकर्ते यांच्या नेतृत्वाखाली शहरातील ब्राह्मण आळीमधील श्री गणेश मंदिर सभागृहात शनिवारी (दि. १७) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

भाजप अलिबाग तालुका उपाध्यक्ष रमेश ढबुशे, विभाग अध्यक्ष अजिंक्य पाटील, चंद्रकांत झावरे, आतीष गायकवाड, सुदाम झावरे, अमर ठाकूर, मोहन शेठ, मयूर झावरे यांनी सोमवारी (दि. १९) रामराज नांगरवाडी येथील धावीर मंदिरात रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. तर मंगळवारी (दि. २०) चौल नाका येथील सुंदर नारायण मंदिरात युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आलाप मढवी आणि कार्यकर्त्यांनी भाजप जिल्हा उपाध्यक्ष हेमंत दांडेकर, जिल्हा कोषाध्यक्ष सतीष लेले, जिल्हा चिटणीस समीर राणे, केदार आठवले, माणिक बळी, दिलीप पटेल, गजानन झेंडेकर, विश्वास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.

भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते प्रकाश भांजी आणि चिंचोटी ग्रामस्थ यांच्या सहकार्याने शुक्रवारी (दि. २३) चिंचोटी येथे मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्यासाठी जगदीश कांबळी, अशोक वारगे, नितीन गुंड, शरद थळे, आणि भाजप कार्यकर्ते सहकार्य करणार आहेत. सोमवारी (दि. २६) थळ विभागात ओबीसी मोर्चाचे रायगड जिल्हा संयोजक जगदीश घरत, सोशल मीडियाच्या जान्हवी पारेख, शैलेश नाईक, पंकज अंजेरा यांनी वृक्षारोपण व स्वच्छता अभियान आयोजित केले आहे.

रविवारी (दि. २५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन 'मन की बात' व स्व. पंडीत दिनदयाळ उपाध्याय यांची जयंती अलिबाग तालुक्यात बुथ स्तरावर आयोजित केली असून या सर्व उपक्रमांत अलिबाग तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन भाजप अलिबाग तालुका सरचिटणीस संतोष हरिभाऊ पाटील व प्रशांत रमण पाटील यांनी केले आहे.

## बेपत्ता महिला तीन महिन्यांनी घरी परतली

### शारीरिक संबंध ठेवण्यासाठी पळवून नेल्याचा गुन्हा दाखल

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील पोशीर ग्रामपंचायत हद्दीमधील चिंचवाडी येथील २२ वर्षीय महिला हरवली असल्याची तक्रार नेरळ पोलीस ठाण्यात दाखल होती. ही महिला तीन महिन्यांनतर ११ सप्टेंबर रोजी आपल्या घरी परतली. दरम्यान, शारीरिक संबंध ठेवण्यासाठी त्या महिलेला फसवून फार्महाऊसवर नेण्यात आले होते, असा गुन्हा नेरळ पोलीस ठाणे येथे दाखल झाला असून याप्रकरणी त्याच वाडीमधील तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे.

चिंचवाडीमधील २२ वर्षीय महिला घरी परतली नाही, म्हणून या महिलेच्या कुटुंबियांनी महिला हरवली असल्याची तक्रार नेरळ पोलीस ठाण्यात दाखल केली होती. त्यानंतर तीन महिने पोलीस व ग्रामस्थ त्या महिलेचा शोध घेत होते. दरम्यान, सदर महिला ११सप्टेंबर रोजी आपल्या घरी चिंचवाडी येथे पोहचली. आपल्याला गावातील एका व्यक्तीने एका फार्महाऊसवर पळवून नेले होते. तेथे तो वारंवार शारीरिक संबंध ठेवत होता. पळून जाण्याचा प्रयत्न केल्यास ठार मारण्याची धमकी त्याने दिली होती, असे त्या पीडित महिलेने १३ सप्टेंबर रोजी कुटुंबियांना सांगितले.

याबाबत पीडित महिलेने केलेल्या तक्रारीवरून नेरळ पोलीस ठाण्यात चिंचवाडीमधील एका तरुणाविरुद्ध फूस लावून पळवून नेल्याचा आणि बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या तरुणाला अटक करण्यात आली आहे. अधिक तपास उपनिरीक्षक माधुरी मुळीक करीत आहेत.

## रिपाइंच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी नरेंद्र गायकवाड

**पाली : प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं)च्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी नरेंद्र गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाचे कोकण प्रदेश अध्यक्ष जगदीश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली परळी (ता. सुधागड) येथे नुकताच रायगड जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशावरून नरेंद्र गायकवाड यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. गाव तिथे रिपाइंची शाखा निर्माण करण्याचा निर्धार यावेळी नवनियुक्त जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनी या वेळी व्यक्त केला.

शिवराय, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळ व धम्म चळवळीला गती देण्यासाठी अधिक जोमाने काम करण्याचा मनोदय व्यक्त करून नवनियुक्त जिल्हाध्यक्ष गायकवाड यांनी, रायगड जिल्ह्यात रिपाईचा रथ अधिक जोमाने पुढे नेण्यासाठी तसेच पक्षाचा तळागाळात प्रचार, प्रसार व विस्तार करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करावे, असे आवाहन केले.

पक्षाचे निरीक्षक ॲड. बी. के. बर्वे, मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, प्रदेश कार्यकारणी सदस्य सुमित मोरे, डॉ. प्रकाशराव शेंडगे, संपर्कप्रमुख धर्मानंद गायकवाड, रिपाइं युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडिक, सुधागड तालुका अध्यक्ष राहुल सोनावळे, पनवेल महापालिकेच्या माजी शिक्षण सभापती विद्याताई गायकवाड, तसेच रवींद्रनाथ ओव्हाल, संतोष गायकवाड़, सुनील सप्रे, मोहन खांबे, लक्ष्मण हाटे आदी पदाधिकाऱ्यांसह जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



# ‘सॅफ’ फुटबॉल स्पर्धेत भारत विजेता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गतविजेत्या भारतीय संघाने दिमाखदार कामगिरी करीत नेपाळवर अंतिम सामन्यात ४-० असा एकतर्फी विजय मिळवून कुमार (१७ वर्षांखालील) ‘सॅफ’ फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेचे जेतेपद पटकावले. साखळी सामन्यात नेपाळने भारताला ३-१ असे नमवले होते. त्याचा वचपादेखील भारताने काढला.

भारताने सामन्याच्या सुरुवातीपासून आक्रमक खेळ करीत नेपाळवर दबाव निर्माण केला. दुसऱ्या सत्रातही भारताने आक्रमक खेळ कायम ठेवला. विजयी भारतीय संघाचे अभिनंदन होत आहे.

# रायगड जिल्ह्यातील खेळाडूंचा सत्कार



**अलिबाग : प्रतिनिधी**

विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या रायगड जिल्ह्यातील खेळाडूंचा जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी (दि. १५) सत्कार करण्यात आला. या वेळी खेळाडू तसेच त्यांचे प्रशिक्षक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांच्या हस्ते टेनिसपटू आकांक्षा दिलीप नित्तुरे (खेलो इंडिया स्पर्धेत रौप्यपदक, एशियन टेनिस टूर स्पर्धा विजेती, राष्ट्रीय टेनिस स्पर्धा विजेती), उंच उडीपटू आर्यन अरुण पाटील (जागतिक शालेय अजिंक्यपद स्पर्धा सहभाग, खेलो इंडिया स्पर्धेत रौप्यपदक, पश्चिम विभागीय स्पर्धेत सुवर्णपदक), धावपटू अब्राहम खासदा (पश्चिम विभागीय स्पर्धेत विक्रमासह सुवर्णपदक), कुस्तीपटू प्रांजल राजाराम कुंभार (मुंबई विद्यापीठ सुवर्णपदक विजेती व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा), कुस्तीपटू पायल संतोष मरागजे (मुंबई विद्यापीठ सुवर्णपदक विजेती व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा), कुस्तीपटू सोहेल शेख (ग्रीको रोमन प्रकारात राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक), धावपटू अभिजित सिंग (पश्चिम विभागीय स्पर्धेत सुवर्णपदक) या खेळाडूंचा तसेच खोपोलीतील कुस्ती प्रशिक्षक राजाराम कुंभार यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून भविष्यातील क्रीडा स्पर्धांमध्ये अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने, मार्गदर्शक श्री. पद्माक्षण, आशिष घायडे, दिपा नित्तुरे, तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, सचिन निकम, कुस्ती मार्गदर्शक संदीप वांजळे, सिद्धार्थ खंडागळे, प्रफुल्ल पाटील, सुरेंद्र कांबळे आदी उपस्थित होते.



# बॅडमिंटन स्पर्धेत ‘आरटीआयएससी’चे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा सबज्युनिअर बॅडमिंटन स्पर्धेत उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (आरटीआयएससी)च्या दोन खेळाडूंनी सुयश प्राप्त केले आहे. ही स्पर्धा नुकतीच कामोठे येथे झाली.

आरटीआयएससीची बॅडमिंटनपटू रिद्धिमा म्हात्रे हिने मुलींच्या १३ वर्षांखालील एकेरी गटात सुवर्णपदक पटकाविले, तर मुलांच्या १५ वर्षांखालील एकेरी गटात शिवम चतुरे याने रौप्यपदक जिंकले. या दोन्ही खेळाडूंचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.












महाराष्ट्र शासन | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



श्री. नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान



राष्ट्रपिता
महात्मा गांधी

## राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता
## सेवा पंधरवडा
**(१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर)**

## नागरिकांच्या प्रलंबित अर्जांचा स्थानिक पातळीवर निपटारा करण्यासाठी
## विशेष मोहीम





## १० सप्टेंबर पर्यंतच्या अर्जांचा निपटारा
आपले सरकार, नागरी सेवा केंद्र व इतर वेबपोर्टलवरील प्रलंबित अर्जांचा जलदगतीने निपटारा.

## याशिवाय विविध विभागांच्या खालील १४ सेवांचा समावेश

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नवीन शासन निर्णयानुसार मदत निधीचे वितरण | ९) | प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजुरी |
| २) | पंतप्रधान किसान सन्मान निधीचा प्रलंबित पात्र लाभार्थ्यांना लाभ | १०) | मालमत्ता हस्तांतरणानंतर विद्युत जोडणीमध्ये नवीन मालमत्ताधारकाचे नाव. |
| ३) | फेरफार नोंदींचा निपटारा | ११) | बिरसा मुंडा कृषी क्रांती योजने अंतर्गत सिंचन विहिरीकरिता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी |
| ४) | शिधापत्रिकांचे वितरण | | |
| ५) | विवाह नोंदणी प्रमाणपत्र | १२) | अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रलंबित वन हक्क पट्टे मंजूर करणे |
| ६) | मालमत्ता हस्तांतरण नोंद | १३) | दिव्यांगांना प्रमाणपत्र |
| ७) | नव्याने नळ जोडणी | १४) | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र |
| ८) | मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र | टीप : सेवा पंधरवड्याचे आयोजन करताना ज्या भागात निवडणूक आचारसंहिता लागू असेल तेथे आचारसंहितेचे पालन करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.(सा.प्र.वि. दि. १२/९/२०२२ रोजीचे पत्र) | |

**सेवा | कर्तव्य | साधना**

श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com